
# छात्र प्रबोधन

सौर श्रावण शके १९२०
वर्ष ७ अंक १

ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी
अभिनव मासिक !



# आवाहन आर्थिक सहकार्याचे!

'छात्र प्रबोधन' मासिक व त्याद्वारा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी चालू केलेली चळवळ, आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावी व तिची वाटचाल दीर्घकाळ चालू राहावी यासाठी आपल्या अर्थसाहाय्याची जोड हवी आहे. छात्र प्रबोधनच्या दीपावली विशेषांकात आणि/अथवा नित्य अंकांमध्ये आपण आपल्या उत्पादनाची, व्यापाराची, व्यवसायाची जाहिरात द्यावी. पानांचे प्रायोजक व्हावे. विविध उपक्रमांसाठी देणगी द्यावी. गरजू-होतकरू विद्यार्थ्यांसाठी छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी भरावी. यापैकी एक किंवा अधिक पद्धतींनी अर्थसाहाय्य करावे व मिळवून द्यावे असे आग्रहपूर्वक, आपुलकीच्या नात्याने आवाहान!

## जाहिरातींचे दर

| | नेहमीचा अंक | दीपावली अंक |
|---|---|---|
| पाव पान | १२००/- | २०००/- |
| अर्धे पान | २०००/- | ३०००/- |
| पूर्ण पान | ४०००/- | ५०००/- |
| मलपृष्ठाच्या आतील पान | ८०००/- | १०,०००/- |
| मलपृष्ठ | १०,०००/- | १५,०००/- |

(सभासदांना जाहिरातींवर १0% सवलत मिळेल.)

## एक पान प्रायोजनाचे दर

वार्षिक प्रायोजक : रु. ४०००/-
दीपावली विशेषांक : रु. ५००/-
नेहमीचा अंक : रु. ४००/-
(१० ते १२ शब्दांचा मजकूर एका पानाखाली छापला जाईल.)

*प्रायोजक व देणगीदारांना आयकरात सवलत हवी असल्यास ८०-जी चे प्रमाणपत्र मिळू शकेल.*

दीपावली विशेषांकासाठी प्रायोजित पानासाठीचा अथवा जाहिरातीचा मजकूर, आर्टवर्क, पॉझिटिव्हज् १५ सप्टेंबरपूर्वी मुख्य कार्यलयात पाठवावे. नेहमीच्या अंकासाठी आधीच्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत मजकूर मिळावा.

**डॉक्टर्स, आर्किटेक्ट्स्, चार्टर्ड अकौंटंट्स्, वकील, व्यवस्थापकीय सल्लागार यांसारख्या व्यावसायिकांनीही देणगीरूपाने अथवा आपल्या मुला-मुलींच्या, आई वडिलांच्या नावे पाने प्रायोजित करून अधिकाधिक अर्थसाहाय्य करावे.**
**(धनादेश 'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने काढावा.)**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपडणाऱ्या एका दर्जेदार मासिकाला मदत केल्याचे समाधान तुम्हाला नक्कीच मिळेल. हाती घेतलेले हे मंगल कार्य पैशामुळे अडणार नाही, असा विश्वास बाळगून आहोत.

**४० हजारांहून अधिक वाचक लाभलेले, हजारो विद्यार्थ्यांचे लोकप्रिय मासिक!**
**लागोपाठ ४ वर्षे दीपावली विशेषांकांना विविध पुरस्कार!!**
**७ व्या वर्षात अनेक आघाड्यांवर आत्मविश्वासपूर्वक घोडदौड!!!**

# ज्ञान प्रबोधिनी परिचय सहल

## 22-23 ऑगस्ट ९८ (शनिवार-रविवार)

ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याबद्दल ज्यांना आस्था आहे, ते काम जवळून बघण्याची ज्यांची इच्छा आहे व त्यासारखे काही कार्य आपल्याही गावात उभे राहावे, अशी मनीषा आहे, अशा सर्वांसाठी २ दिवसांची 'प्रबोधिनी परिचय सहल' योजली आहे.

त्यामध्ये पुणे-निगडी-साळुंब्रे व खेड-शिवापूर येथील शिक्षण-संघटन-संशोधन-आरोग्य-उद्योग व ग्रामविकसन प्रभागातील विविध विभाग, प्रकल्प पाहणे व तेथील कार्यकर्त्यांचा परिचय करून घेणे, असा सर्वसाधारण कार्यक्रम असेल.

२१ ऑगस्ट रोजी मुक्कामाला अथवा २२ ऑगस्ट रोजी सकाळी ७.०० पूर्वी आपण ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे यावे. २३ ऑगस्ट रोजी सायं. ५.०० वा. पुण्यात सहल संपेल. (ज्यांना सिंहगडावर यावयाचे असेल अशांना पुण्यास परत यायला रात्रीचे ९ वाजतील. ते रात्री प्रबोधिनीत मुक्काम करू शकतील.)

सहलीचे शुल्क रु. १५०/- असून त्यामध्ये २१-२२-२३ ऑगस्ट चा निवास-भोजन-प्रवास खर्चाचा समावेश आहे. (बरोबर येताना स्वतःचे पांघरूण घेऊन यावे.) सहलीचे शुल्क मुख्य अथवा स्थानिक कार्यालयात १५ ऑगस्टपूर्वी भरून नावनिश्चिती करावी. (आयत्यावेळी शुल्क भरून सहलीला कोणी येऊ नये.) ही सहल प्रामुख्याने वय वर्षे १८ व वरील वयोगटातील सदस्यांसाठी योजली आहे. आपण केव्हा येणार आहात व केव्हा परत जाणार आहात हे शुल्क भरताना कळवावे.

**ज्ञान प्रबोधिनीमध्ये आपणा सर्वांचे स्वागत आहे!**

# अंतरंग

**छात्र प्रबोधन**

वर्ष ७ अंक १
सौर श्रावण
शके १९२०


| | |
|---|---|
| २ | **संवाद** : प्रा. महेन्द्र सेठिया |
| ३ | **पूर्णावतारी श्रीकृष्ण** : डॉ. वि. य. कुलकर्णी |
| ६ | **कविता : वाट** : डॉ. किरण पुरंदरे |
| ७ | **क्रियासिद्धि : सत्वे वसति..! :** सौ. सुलभा जोगळेकर |
| ९ | **फुटबॉलच्या महायुद्धात फ्रान्सची जीत ! :** श्री. मिलिंद ढमढरे |
| १३ | **जीवाणू** : श्री पुरूषोत्तम जोशी |
| १४ | **पुण्यश्लोक अहल्याबाई** : स्वाती ढेकणे |
| १५ | **तेथे कर माझे जुळती** : चि. अमोल निसळ |
| १७ | **शोध सर्वोच्च शिखराचा** : प्रा. प्र. के. घाणेकर |
| २० | **संग्रह करता करता शिकू या** : प्रा. विवेक पोंक्षे |
| २१ | **कथा–फिनिक्सः** प्रा.शैलजा देशमुख |
| २५ | **भात लावणीची ओली कहाणी :** प्रा.राम डिंबळे |
| २७ | **कविता : नाचू पाण्यात** : सरिता पदकी |
| २८ | **गाव मनातलं:** सौ. स्नेहल चिपळूणकर |
| २९ | **अभ्यासातील स्वालंबन – आकलन – भाग १** : प्रा. विवेक पोंक्षे |
| ३० | **वाचलेच पाहिजे असे काही– सुदाम्याचे पोहे :** चि. अद्वैत इंगोले |
| ३२ | **ऑगस्ट –सप्टेंबर महिन्याचा कार्यक्रम** |




इवली शल्ये रुपती खुपती,
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E., M.Ed.
शैलजा देशमुख M.A. M.Ed.
दत्ता श्री. टोळ B.A., B.COM.
विवेक पोंक्षे M.SC, B.Ed.

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
गिरीश सहस्त्रबुद्धे

**अक्षरजुळवणी**
प्रिंट लिंक, पुणे

**मलपृष्ठावरील कविता**
डॉ. कल्याण इनामदार

**संपर्क पत्ता**
'छात्र प्रबोधन'
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे – ४११०३०
फोन नं. ०२१२–४७७६९१,
४७८०९५

**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर १० श्रावण, शके १९२०
१ ऑगस्ट १९९८

**वर्गणी भारतात**
**वार्षिक :** रु.१२५/–**द्वैवार्षिक :** रू.२४०/–
**त्रैवार्षिक :** रु.३५०/–**आजीवन :** रु.२०००/–
**भारताबाहेर – वार्षिक :** ३० डॉलर

येता श्रावण संगत डोले आसमंत सारा, क्षणी उन्हाची तिरीप, कधी बरसती धारा.

प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,

## संवाद

छात्र प्रबोधनच्या सातव्या वर्षात तुम्हा सर्व प्रबोधकांचे मनःपूर्वक स्वागत!

छात्र प्रबोधन आता निव्वळ मासिक न राहता त्याचे रूपांतर तुमच्यासारख्या अनेक मुलामुलींच्या सर्वांगीण विकासाच्या चळवळीमध्ये होऊ पाहात आहे. तुम्ही सर्वजण यात कसे सहभागी होता यावर या चळवळीचा तुम्हाला किती फायदा होणार हे अवलंबून आहे. पण त्याही पेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'इतरांच्या विकसनामध्ये आपला खारीचा वाटा उचलण्याची संधी तुम्ही अनेकांनी घ्यावी यासाठी खरं तर ही चळवळ आहे.

एका बाजूला आपण स्वतः शिकायचं, नवनवीन अनुभव घ्यायचे, विविध प्रकारची माहिती गोळा करायची, तिचा उपयोग करून व्यवहार चातुर्य आणि विचार कौशल्ये विकसित करायची, अनेकांच्या संपर्कामधून लोकांशी कसे वागावे, माणसांची पारख कशी करावी, त्यांना आपले म्हणणे पटवून कसे द्यावे, त्यांच्यातील गुण कसे हेरावेत, यासाठीची कौशल्ये व जाण वाढवायची, स्वतःच्या क्षमता ओळखायला शिकायचे अन् त्या ताणण्याची संधी घ्यायची. संकटांना-अडचणींना समर्थपणे सामोरे जाण्याची हिंमत मिळवायची अन् नवा वाटा निर्माण करण्याची जिद्द बाळगायची अशा कितीतरी गोष्टी आपण स्वतः आत्मसात करायच्या.

तर दुसऱ्या बाजूला आपल्या वयाच्या, आपल्यापेक्षा लहान वयाच्या ज्या अनेक विद्यार्थ्यांपर्यंत ही विकासाची संधी आपोआप पोहोचण्याची शक्यता अगदीच दुर्मिळ आहे, त्यांच्यापैकी काहींपर्यंत ही संधी आपण पोहोचवायची. आपण त्यांच्याकडे जाऊन मैत्रीच्या भावनेने, आपल्याकडील कौशल्य-ज्ञान-अनुभव त्यांच्यापर्यंत पोहोचवायचे. यातून आपल्यालाही खूप शिकायला मिळेल. पण त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद-उत्साह पाहून आपल्यालाही विलक्षण आनंद, समाधान मिळेल.

अशी दुहेरी प्रक्रिया सतत चालू राहावी, यासाठी छात्र प्रबोधनची धडपड चालू आहे. ही प्रक्रिया इतकी सरळ-साधी-सोपी नाही. ती थोडी अवघड आहे पण शक्य आहे. अन् अवघड आहे म्हणूनच तर आपण प्रबोधकांनी ती केली पाहिजे. या मासिकाच्या सातव्या वर्षात तुम्हा सर्वांकडून ही अपेक्षा आहे.

गेल्या महिन्यात सांगली-इचलकरंजी-बोरीवली-डोंबिवली येथील सभासदांशी बोलणे झाले. त्यांच्यासमोर वेगवेगळ्या शब्दांमध्ये वरील विचार मांडला. त्यातल्या काहींनी उत्स्फूर्तपणे प्रतिक्रिया व्यक्त केली की आम्हाला हे सगळं खूप करावंसं वाटतं, मनापासून पटतंही, आम्ही ते करायचं ठरवतोसुद्धा. पण आळस-कंटाळा-अन्य आकर्षणे या सगळ्यांपुढे ते मागे पडते. निश्चयशक्ती कमी पडते जमेल असं वाटतं पण चिकाटी-जिद्द कमी पडते ती कशी वाढवायची हे कळत नाही. मला असं वाटतं की तुमच्यापैकी अनेकांची अशीच मनःस्थिती असणार. तेव्हा त्यावर एक छोटीशी गोष्ट सुचवतो. करून बघा. रोजच्या दिनक्रमात अशी काही तरी एक गोष्ट असावी की ती केल्याशिवाय नाष्टा करणार नाही किंवा दुध-चहा पिणार नाही किंवा जेवणार नाही किंवा झोपणार नाही. ती गोष्ट करण्यासाठी अगदी २ ते ५ मिनिटेच वेळ लागेल. पण ते झालंच पाहिजे. १० सूर्यनमस्कार घालणे, ३-४ मिनिटे उपासना-ध्यान करणे, दोरीच्या उड्या, जोर-बैठका-पळणे इ. व्यायाम, मनाचे श्लोक, गीता-गीताई, दासबोध यामधील रोज ५ श्लोक वाचणे, यासारख्या कितीतरी गोष्टींची यादी करता येईल. त्यातली कोणतीही एकच गोष्ट निवडा आणि ती झाल्याशिवाय खाणे-पिणे-झोपणे यांपैकी काहीतरी करणार नाही असे ठरवा. कितीही अडचणी येवोत. पण ते झाल्याशिवाय विशिष्ट गोष्ट नाहीच करणार असे घडू देत. ही कमी वेळाची, छोटीशी, सोपी गोष्ट आपण सातत्याने करत राहिल्याने करारीपणा, जिद्द निश्चयशक्ती वाढते. प्रवासात असलात किंवा नातेवाईकांच्या घरी गेलात तरी सुद्धा यात खंड पडू देऊ नका. एक महिनाभर तुम्ही असं केलंत की मला पत्र पाठवा. अशा जिद्दी -करारी प्रबोधकांशी मला व्यक्तिशः पत्रमैत्री करायला निश्चितच आवडेल. पाहुयात तुमच्यापैकी किती जणांची पत्रे येतात ते!

ऑगस्ट अन् श्रावण-भाद्रपद महिन्यांमध्ये उत्सवांना अन् उत्साहालाही भरती येते. या भरतीवर स्वार होऊन त्याचा मनमुराद आनंद लुटा. या उत्सावांमागील कल्पना-हेतू-अर्थ समजून घेत ते नवीन पद्धतीने करण्यातील मजा काही औरच असते. तीही अनुभवा. अन् आम्हाला कळवा.

तुमच्या प्रतिसादाच्या प्रतीक्षेत

सस्नेह तुमचा

महेन्द्र सेठिया

# पूर्णावतारी श्रीकृष्ण



***जन्माष्टमी किंवा दहीकाला म्हटलं की गवळीपणींच्या घरी शिंक्यावरचं लोणी, दही चोरून खाणारा कृष्णच आपल्या डोळ्यांसमोर येतो. त्याची आठवण म्हणून तर उंचच उंच दहीहंड्या उभारून, अनेक 'गोविंदा'मोठे मनोरे करून त्या फोडतात. असं चोरून लोणी, दही खाण्यातली मजा काही औरच असते. गोकुळाष्टामीच्या निमित्ताने सर्वगुणसंपन्न आणि पूर्णावतारी कृष्णाच्या विविध रूपांची आपल्याला ओळख करून देत आहेत–***

***डॉ. वि. य. कुलकर्णी***

**भा**रतीय लोकमानसात 'रामकृष्णांच्या मूर्ती' ठसल्या आहेत; आणि'राम-कृष्ण-हरी' हाच जप ते करीत आले आहेत. आपणही आज भगवान श्रीकृष्णांची शब्दपूजा करणार आहोत.

ज्ञानदेवांनी वाग्यज्ञाने विश्वात्मक देवाची पूजा केली. आपणही आपल्या कुवतीप्रमाणे हा वाग्यज्ञ आरंभिला आहे. ही सद्भावाची अंजुळी भगवान श्रीकृष्णांच्या अंघ्रियुगुली वाहाणार आहोत. त्या पूर्णावतार भगवंताची पूजा आपण करीत आहोत. पूजेसाठी मूर्ती हवी ! ही मूर्ती आपण शब्दांनीच साकार करणार आहोत. शब्दांनी डोळ्यासमोर चित्र उभे केले तर त्यास शब्दचित्र म्हणतात. इथे चित्र नाही. शिल्प आहे. भगवान श्रीकृष्णांचे शब्दशिल्प आपण उभे करीत आहोत. हेच आपोआप आपले ध्यानही आहे. एक आनंदाची गोष्ट अशी आहे की, ध्यान व रूप इथे एकरूप झाले आहेत.

वाल्मीकींचे नि व्यासांचे आपणावर थोर उपकार आहेत, त्यांनी राम आणि कृष्णाला 'पूर्ण ब्रह्म' या स्वरुपात पाहिले. श्रीराम व श्रीकृष्ण या सामान्य व्यक्ती नाहीत. या महाकवींच्या दृष्टीने ते अवतार आहेत! साध्या सोप्या भाषेत सांगायच झाले तर श्रीराम व श्रीकृष्ण या पूर्णत्वाच्या मूर्ती आहेत. श्रीरामांना 'मर्यादा पुरूषोत्तम' म्हणतात. व्यास-वाल्मीकींनी या महामानवांना सामान्य ऐतिहासिक व्यक्ती मानलेले नाही. त्या पूर्णावतारी व्यक्ती असून त्यांच्या जीवनाकडे अलैकिक भूमिकेतून पाहिले आहे. त्यांनी हा इतिहास असूनही इतिहास-लेखन केले नाही. त्यांच्या जीवनास महाकाव्याचे स्वरूप दिले.

श्रीकृष्णाचा 'अहं' पूर्णपणे विरघळलेला आहे. त्याची स्वतःची कोणतीच रेखाकृती नाही, विकार नाही; अहंकार नाही. स्वतःसाठी त्याचे काहीही नाही. अहंकार कुठल्या तरी एखाद्या गुणात वावरतो. निर्गुणात निरहंकारिता असते. माऊलीने अमृतानुभवात ब्रह्माचे वर्णन करताना म्हटले आहे– 'विरुद्धा पाहुणेर ययाचे घरी!' अत्यंत परस्पर विरोधी गुण ज्यावेळी एकत्र येतात आणि आपला तोल सांभाळतात त्यावेळी ते निर्गुण झालेले असतात. श्रीकृष्णाचे निर्गुणत्व आणि परब्रह्मत्व अशा रीतीने सिद्ध होते.

श्रीकृष्णामध्ये कमालीचे परस्पर विरोधी गुण आहेत आणि त्यांचा त्याने सुरेख तोलही साधलेला आहे. आपण कुणीकडे तरी एकीकडे झुकतो. आमच्यामध्ये एक तर काम-विकार असेल नाहीतर संन्यास. अतिशय क्रोध तरी असेल किंवा कमालीची शांती तरी ! राग, कणखरपणा नाहीच. कसलीही चीड नाही. श्रीकृष्ण कुणीकडे एकीकडे झुकलेला नाही कारण कृष्णाचे विकार त्याच्या ताब्यात आहेत. 'कूर्मोऽङगानि इव सर्वशः!' म्हणून श्रीकृष्ण निर्गुण आहे. श्रीकृष्णात परस्पर विरोधी गुण दिसतात. सारी भाव-द्वंद्वे दिसतात. सौंदर्यप्रिती आणि वैराग्य; योग आणि भोग; वैभव आणि त्यागशीलता, सामर्थ्य आणि दयाशीलता, कोमलता आणि कठोरता, तटस्थता आणि रसिकता,क्रोध आणि शांती, प्रेम आणि द्वेष, सौंदर्य आणि शक्ती. तो निराकार होतो. अहंशून्य होतो. 'तुका म्हणे जे जे बोला, ते ते साजे या

आपुल्यासाठी अयोग्य जेजे, दुसऱ्यासाठी ते न करा ; हेच सार धर्माचे आहे, बाकी सगळा स्वार्थ खरा.

विठ्ठला'. आपल्या मनात जे जे येईल ते ते त्यात आहेच.अशी स्थिती असल्यामुळे श्रीकृष्ण परब्रह्म आहे. परब्रह्म निर्गुण आहे. आकाशा नलगे लेपु जैसा ! तसाच कृष्णालाही कोणताही गुण चिकटत नाही. म्हणून तो वैराग्य संपन्न !

श्रीकृष्णाचे विकार किती ताब्यात होते; ते एका प्रसंगाने सांगता येईल. त्याने ठरवले की, क्रोध येऊ द्यायचा नाही, शांती ढळू द्यायची नाही, की क्रोध येत नाही. तो प्रसंग असा–

एकदा दुर्वास द्वारकेत आले. म्हणू लागले की, 'कुणीतरी मला अतिथी म्हणून ठेवून घ्या.' जर कुणी म्हणाला, यावे महाराज !' तर दुर्वास त्याला बजावत, 'हे पाहा, मी रागीटआहे. माझ्या मनाविरुद्ध काहीही झालेले मला खपायचे नाही. मी शाप देईन. त्यापेक्षा आधीच नाही सांग !'–आता अशा व्यक्तीला कोण 'या' म्हणणार? श्रीकृष्णाने दुर्वासांना म्हटले, 'आपण माझ्याकडे या. आपल्या मनाविरूद्ध माझ्याकडे होणार नाही !'

दुर्वास त्याच्याकडे अतिथी म्हणून गेले; परंतु त्यांनी कृष्णाची परीक्षाच घ्यायचे ठरवले.

दुर्वासांनी ठरवून कृष्णाला राग येईल असे प्रयत्न केले. वाटेल तेव्हा भोजन मागितले. रात्री अपरात्री तयार केलेले भोजन दूर सारले. रात्री–अपरात्री भसाड्या आवाजात गात सुटायचे! कधी रडायचे ! एकदा त्या वाड्याला आग लावून टाकली पण कृष्ण शांत होता. शेवटी दुर्वासांनी कृष्णाला म्हटले, 'भर दुपारच्या उन्हात तू आणि रूक्मिणी मला द्धारकेत हिंडवून आणा. मी रथात बसेन. तू आणि रुक्मिणी रथ ओढा. पायात काही नको, अनवाणी रथाला जुंपा.'

श्रीकृष्ण व रुक्मिणी रथाला जुंपले. हा दिव्य रथ द्वारकेतून निघाला. दुर्वास मुद्दाम रूक्मिणीला ढोशीत होते. फटकारे मारीत होते. ती खाली पडली. तरी श्रीकृष्णाची शांती ढळली नाही. दुर्वासच पळत सुटले.

श्रीकृष्ण दुर्वासांमागे धावला. हात जोडून म्हणाला, 'आपण का पळालात? चलावं महाराज.' तेव्हा दुर्वासांनी म्हटले, 'कृष्णा, तू खरोखरच क्रोध जिंकला आहेस !'

श्रीकृष्ण हवा तेव्हा नि हवं तितकेच रागावू शकत होता. युद्धात भीष्मावर सुदर्शन चक्र घेऊन धावलाच ना? आणि द्रोणासमोर सौम्यपणे युद्ध करणाऱ्या अर्जुनाला त्याने फटकारलेच ना?–

बरे, श्रीकृष्णाचा साधेपणा किती? तर उष्टी काढली. सारथ्य केले. घोड्यांना खरारा केला. कुणाला साधे काम करायला लाज वाटते. अपमान वाटतो. आपला अहंकार दुखावतो, अहंकार विरघळल्यावाचून साधेपण येत नाही आणि साधेपणाला फार मोठी संस्कृती लागते.

मोठ्यांचे मोठेपण हेच की, लहानांना हा आपल्यापेक्षा मोठा आहे. हे कळू नये ! श्रीकृष्ण गोकुळात असाच वावरतो. कुणालाही हा वेगळा आहे, ज्ञानी आहे, योगी आहे, याची त्याने कल्पना येऊ दिली नाही रूसणारा, फुगणारा, खोड्या करणारा, खेळणारा, भांडणारा, सतावणारा, रमवणारा, नाचणारा असा तो कृष्ण आहे ! त्याच्या मनाला निश्चित आकार नाही. मेघःशाम म्हणजे मेघासारखा सावळा तर आहेच परंतु मेघासारखा प्रतिक्षणी नवा आकार घेणाराही आहे. नित्य नवा आकार घेण्याची क्षमता असणे म्हणजे निराकारिता ! आपली मने वाळलेली असतात. मोडतात पण वाकत नाहीत ! ओली माती वळते. कोणताही आकार घेते. आपला आकार चटकन बदलतेही ! वैराग्यसंपन्नता म्हणजे मनाची नित्य नवा आकार घेण्याची क्षमता ! आकाराचा आग्रह नसणे म्हणजे वैराग्य ! कौटुंबिक जीवनातही कृष्ण हे हवेच. वैराग्यसंपन्न व्यक्ती अहंकारशून्य असते म्हणून आग्रहशून्य असते. निराकार असते म्हणून कोणताही आकार सहजतेने घेते.

श्रीकृष्ण हे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व होऊन गेले. असे संपन्न व्यक्तिमत्त्व पृथ्वीतलावर दुसरे दाखवता येणारे नाही. खऱ्या अर्थाने या व्यक्तीमत्त्वाला 'अ–द्वितीय' म्हणायला हवे. सर्व तऱ्हांच्या सर्व वयोगटातील व्यक्तींना तो आपला वाटतो.

लहान मुलांना कृष्ण फार आवडतो. मुलांना तो आपलाच वाटतो. माती खाणारा कृष्ण, रांगणारा कृष्ण, लोणी मागणारा कृष्ण, गोपांना लोणी चारणारा कृष्ण दूध – दही सांडून ठेवणारा आणि आईच्या हातचा मार खाणारा कृष्ण–या गोष्टी म्हणजे मुलांच्या आनंदाचाच विषय ! त्याच्याबद्दल गौळणी तक्रार घेऊन आल्या तर कृष्ण साळसूदपणाने 'मी नाही ग आई असे करत. या उगाच आळ घेतात !' असे गाल फुगवून म्हणणारा कृष्ण लहान–मुलांचा मोठा लाडका असतो.

तरुणांना कृष्ण आपला वाटतो. तरुणांच्या स्वभवाचे आकर्षण मुग्ध प्रेमभावनेत असते. आनंदाने हसणे, नाचणे, गाणे यात असते. उत्साहाला नुसते उधाण यायला हवे. दुसरा आकर्षण विषय म्हणजे पराक्रम ! श्रीकृष्ण तरुण-तरुणींना याच गुणांनी प्रिय आहे.

सर्वांनाच तो हवाहवासा वाटतो. कृष्णाचे डोळे तर विलक्षण बोलके. या डोळ्यात किती विलक्षण भाव चमकत असतील ! यशोदेला या डोळ्यांची भीती वाटते आहे, असे खोटेच दाखवले असेल. गोपींना प्रीती दाखवली असेल. पांडवांना आश्वासन, द्रौपदीला निष्काम प्रेम, अर्जुनाला ज्ञानमयता, शत्रूंना धाक, रूक्मिणीला प्रणय, तर भीष्म व्यासांना यौगिक शांती याच डोळ्यात दिसली असेल ! हाच कृष्ण रंगपंचमीच्या होळीत देहभान विसरायलाही लावतो.

कृष्ण क्रीडापटू आहे, तसाच तो लोकरक्षक आहे. पूरग्रस्तांना तो डोंगरात आश्रय देतो. कालिया नागाच्या डोक्यावर थयथय नाचतो. अनेक राक्षसांना हसत-खेळत यमसदनाला पाठवतो. वृद्धांना नवी क्रांतिकारक दृष्टी देणारा म्हणूनही तो तरुणांना आवडतो. 'इंद्राची पूजा नको, आपण डोंगराचीच पूजा करू' असे सांगून रूढीला नवेच वळण देणारा कृष्ण सर्वांना कमालीचा प्रिय आहे.

कलावंतांनाही श्रीकृष्ण म्हणजे 'त्याचे कला-जीवन' असाच वाटतो. कृष्णाने नाट्य-विषय पुरवले. कृष्ण नृत्याचा विषय होऊन गेला. कृष्ण गीतांचा विषय होऊन गेला. संगीताची व्याख्या करताना 'गीतं, नृत्यंच नाट्यंच त्रय संगीतमुच्यते, असे म्हणतात. संगीताच्या या तिन्ही प्रकारांचा कृष्ण हा नित्य-नूतन असा विषय आहे. कृष्णाचे जीवन म्हणजे नवरसांचा उचंबळता सागरच होय.

खरे तर कलावंतामध्ये साहित्यकही येतातच;साहित्यिकांच्या दृष्टीने श्रीकृष्णाइतके संपन्न व्यक्तिमत्त्व सापडणेच कठिण ! इतके मनोहर, विलक्षण रंग-रूपाचे, आणि अतितलम पोताचे हे भरजरी वस्त्र आहे. झुंबराच्या लोलकांतून प्रत्येक हेलकाव्याबरोबर अति-तेजस्वी किरण-शलाका बाहेर पडाव्यात तसे कृष्णाचे व्यक्तिमत्त्व नेत्रदीपक आहे. श्रीकृष्णाचे जीवन म्हणजे भावभावनांची थुईथुई उडणारी कारंजीच आहेत. श्रीकृष्ण भावनांचा स्पर्श करतो. तसाच विचारांनाही ! स्वा. सावरकरांनी म्हटले आहे की, 'श्रीकृष्णाची अनेक भाषणे मी कंठस्थ केली.' श्रीकृष्णाचे वक्तृत्व म्हणजे वाणीचे शिल्प' अशा शब्दांनी डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी गौरविले आहे.

राजकारणी लोकांना श्रीकृष्ण तर त्यांचा आदर्शच वाटतो. विशेष असे की, क्रांतीचा नि शांतीचा संदेश देणारा कृष्णच ! लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर, भगतसिंग, चाफेकर अशा कितीतरी क्रांतिकारकांना गीतेनेच स्फूर्ती दिली. राजकारणात श्रीकृष्ण कमालीचा चतुर आहे. सावध आहे नि कुटिलांचे डाव उलटविण्याइतका कुटिल कारस्थानीही आहे. भगवान श्रीकृष्णाच्या राजनीतीच्या पावलावर पाऊल चाणक्याने टाकले. शिवाजी महाराजांनी टाकले नि स्वा. सावरकरांनी टाकले. राजनीतीकुशलांचा श्रीकृष्ण हा मानदंडच मानायला हवा.

साहित्यिक, राजकारणी आणि कलावंतांना श्रीकृष्ण हा संपन्न, रसिक ज्ञानी, समतोल असा तत्त्ववेत्ता वाटतो. भगवद्‌गीतेसारखे सार्वकालिक व सर्वमान्य तत्त्वचिंतन देणारा हा 'योगेश्वर' ऋषि-मुनींचाच नव्हे, तर विद्‌वानांचा, पंडितांचा, अभ्यास विषय झालेला आहे.

सर्वसामान्य भारतीय लोकमानसात श्रीकृष्ण हा साक्षात 'परमात्मा' म्हणूनच रुजला आहे. श्रीकृष्ण अनेक संप्रदायांचा नि संतांचा आराध्य-देव आहे. राधा-कृष्ण संप्रदाय, सूरदास, मीरा, वल्लभ संप्रदाय, चैतन्य संप्रदाय, महानुभाव संप्रदाय इत्यादींनी त्याचे ईश्वरत्व स्वीकारले आहे. स्त्रीगीतांत श्रीकृष्ण हा ध्यान विषय झालेला दिसून येतो, म्हणून संतांनी श्रीकृष्ण हे परमतत्त्व किंवा पूर्णब्रह्म म्हणूनच त्याचा स्वीकार केला आहे.


अशा रीतीने भारतीय लोक मानसात 'राम-कृष्णां'च्या मूर्ती ठसल्या आहेत. 'रामकृष्णहरि' हीच त्यांनी अंतरी जपमाळ धरली आहे.

**डॉ. वि. य. कुलकर्णी**
कांचन सोसायटी, शनिवार पेठ,
पोलिस चौकीजवळ, पुणे ३०.

अशीच संगीते आळवी तुझी कल्पकता, घडीभर जागव रे आमुची अशी मानवता.

# वाट

वर्षातून किमान एकदा तरी
वाट धरावी मातीची
विसरून जावं सगळं आणि
सूर जुळावे रानाशी।।१।।





शिशिरातली पानगळ अन्
भरारणारा पिसाट वारा
संध्याकाळी आकाशात
राज्य करतो शुक्रतारा ।।७।।



वाट सारखी सांगत असते
ऐकलं तर बोलत असते
पशुपक्ष्यांच्या पाऊलखुणांची
ओळखपत्रं दाखवते।।२।।

वैशाखात तु साक्षी असते
उजाडलेल्या झाडांची
रविकिरणांच्या सुऱ्या दुधारी
घालमेल होते वनजीवांची ।।८।






वाटेवरच्या मऊमऊ मातीत
मोरकिडे सापळे लावतात
वानरटोळ्या धूडगूस घालून
पानाफुलांचा सडा घालतात।।३।।

जलबिंदूंची अत्तरदाणी
शिंपत असते वर्षा राणी
वाटेला मग भरती येते
रानफुलांची, तृणपात्यांची ।।९।।



एखादी वाट घेऊन जाते
झाडीभरल्या डोंगरावर
थंडगार वाऱ्याच्या झुळका
लपेटून घ्याव्यात अंगावर।।४।।

नव्या दिसाची चाहूल देत
तेव्हा पहाट फुलत असते
दवबिंदूंची अंगतपंगत
मोत्यांची रास चमचमते।।१०।





वाट अधूनमधून वळत जाते
दिशाचं भान विसरायला लावते
मग अचानक सरळ होऊन
आनंदाची बातमी देते।।५।।

मावळतीला ती भिती घालते
हरवून जाते अंधारात
सरावलेली पावलं सुध्दा
जपूनच टाकावी लागतात।।११।।

वाट कधीकधी गाणं गाते
रानपाखरांच्या गोड गळ्यांनी
लचकत, मुरडत, दौडत जाते
हरीणपिलांच्या टापांनी।।६।।

रात्रीचा अजगर येतो जेव्हा
वृक्षछाया काजळतात
वाटसुरूच्या मनात तेव्हा
गोऱ्या पाली चुकचुकतात।।१२।।

**किरण पुरंदरे**
६२/अ, प्रशांत,
एरंडवणे, गावठाण
पुणे ४

# क्रियासिद्धि : सत्वे वसति...!

***मुलांनो, वीर सावकरांविषयी तुम्हाला वेगळं काय सांगायचं ? इंग्रज सत्तेवर असताना भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या सक्रिय सहभागाविषयी तुम्ही जाणताच. पण या स्वातंत्र्यवीराच्या कठोर मनातही एक हळूवार कवी होता. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने सावरकरांमधल्या या कविचीच आपल्याला ओळख करून देत आहेत, सौ. सुलभा जोगळेकर.***

संध्याकाळ झाली. काम संपल्याची सूचना मिळाली. सर्वांबरोबर तोही आपल्या खोलीत परतला. छोट्याशा झरोक्यातून येणाऱ्या अंधुक प्रकाशात. खोलीतल्या मोजक्या वस्तू अस्पष्ट दिसत होत्या. नजर जरा स्थिरावल्यावर तो आपल्या अंथरूणावर जाऊन बसला. खूपच थकला होता तो. सोसणार नाही एवढं कष्टाचं काम झालं होतं दिवसभर !

जरा वेळानं जेवण आलं. सर्व आटोपून तो आडवा झाला आणि कामाच्या नादात दिवसभर बाजूला झालेल्या विचारांनी पुन्हा त्याच्या मनाचा ताबा घेतला.

तो कवी होता. विनायक नाव त्याचं. कितीतरी दिवसांपासून एक सुरेख कथानक त्याला भुरळ घालीत होतं. सुंदर सुंदर कल्पना त्याच्या मनात पिंगा घालीत होत्या. लाटेमागून लाट यावी तशा. नऊरस समोर रुंजी घालीत होते. 'तुझ्या काव्यात सहभागी व्हायचं भाग्य लाभू दे आम्हाला', असं म्हणत; शब्दालंकार, अर्थालंकार, विविध वृत्त यांनी तर त्याच्या भोवती नुसता फेर धरला




होता. त्यांना पण त्याच्या काव्यात स्थान मिळवायचं होतं.

त्याच्या मनात आलं, शारदेला ईशस्तुती लिहायची होती, तर तिला सुद्धा लिहायला साधनं लागली ना ! काय काय साहित्य जमवलं तिनं, सर्व पृथ्वीचा कागद घेतला, सप्तसागरात कृष्णपर्वताचं काजळ घालून शाई बनवली, कल्पवृक्षाच्या शाखांची लेखणी केली.

तिच्या एवढं जरी नाही तरी माझं काव्य निश्चित दर्जेदार होणार आहे. पण मी लिहू कशावर ? कशानं ?

नऊ रसांना म्हणाला तो, ''अरे माझ्या काव्यात तुमचा सहभाग तर हवाच आहे. घेईन मी तुम्हाला.''

वृत्तांना म्हणाला, ''मी तर एक नवं वृत्त निर्माण करणार आहे, 'वैनायक'. पण तुम्हालाही विसरणार नाही. तुमच्यासाठीही

परि याच्या नयनात, नसे भीतीचा अंधार, जणु अजिंक्य तेज़ाचा, नेत्री तळपे भास्कर

माझ्या काव्यात मानाचं स्थान ठेवणार आहे.'' अलंकारांचा तर प्रश्नच नव्हता. त्यांच्या शिवाय काव्याला मधुरताच येणार नव्हती. पण प्रश्न होता लिहायला साधनं कोणती ?

मनात विचार चालूच होते. पंचमहाभूतं सोडवतील का माझा कागदाचा प्रश्न ? त्यातलं जलतत्त्व तर चंचल आहे. हलक्याशा वाऱ्यानं त्यात तरंग निर्माण होतात. अक्षर वाङ्मयाला ते अगदी निरूपयोगी. तेजाला विचारू कां ? परंतु माझ्या ओजस्वी काव्यामुळे आपलं तेज उणावेल असं त्याला वाटलं तर ? वायू सुद्धा चंचलच. असला अस्थिर कागद नको. मग नभतत्त्वाला विचारावं ? स्थिरही आहे अन् विस्तीर्ण अपरंपार आहे. कमी नाही पडायचा हा कागद.

त्यानं आकाशाला विचारलं. आकाशाचा एक छोटासा तुकडा त्याच्या खोलीच्या झरोक्यातून दिसत होता.

त्यानं विचारलं,''आकाशा, माझ्या काव्यासाठी कागद होशील तू ?''

आकाश हसलं उपहासानं.म्हणालं, ''अरे तू तर कैदी आहेस. माझ्यावर काव्य लिहायचं तर पीस होऊन माझ्याजवळ यावं लागेल, तुझ्या पायातल्या बेड्या पाहिल्यास ना ? तुला कसं शक्य आहे हलकं होणं ? तू असं कर, ती भूमी आहे ना, तुझ्या पायाखालची, तिला विचार ती जड स्थिर आहे तुझ्यासारखी. ती करील तुझं काम !''

पृथ्वी म्हणाली, ''झाले असते रे मी तुझा कागद, पण ती शारदा वेगवेगळ्या ऋतुत, वेगवेगळी वृक्षलतांची, पाना-फुलांची काव्यं लिहितेय माझ्यावर. मी रिकामी नाहीये.''

विनायक हताश झाला, काव्याची ऊर्मी स्वस्थ बसू देईना. काय करावं ?

अन् अचानक चमत्कार घडला. असाच चमत्कार पूर्वीही घडला होता. ज्ञानेश्वरांच्या काळी चांगदेवांचा अहंकार नष्ट करण्यासाठी निर्जीव भिंत सजीव झाली होती. शुभ्र सुंदर गोष्टींवर श्रद्धा ठेवणाऱ्या भारतातच असे चमत्कार घडतात.

आजही तोच चमत्कार घडला. विनायकाला झोप येत नव्हती. विचार मंथन चालू होतं. मंथनातून शुद्ध स्निग्ध नवनीत निघालं. समोरच पांढरी शुभ्र भिंत दिसली.लिहावं या भिंतीवर? एखाद्या काट्यानं, खिळ्यानं शब्दशिल्प सजवावं या भिंतीवर? कोरून ?

आणि ती निर्जीव भिंत सुरेख काव्यासाठी कागदाच्या रूपात सज्ज झाली. कमला काव्यांच कमळ तिथं फुललं.

राजद्रोहाच्या अपराधासाठी दोन जन्मठेपींची शिक्षा भोगणारा तो कैदी ! कोणता गुन्हा होता त्याचा ? अपहार? हत्या ? छे ! छे ! देशावरती प्रेम तयाचे हाच गुन्हा त्याचा ! अंदमानच्या तरूंगातली ती छोटीशी कोठडी ! त्या कोठडीच्या भिंतीवर काव्य शिल्प कोरलं गेलं ''कमला.''

हात पोचेल एवढ्या उंचीपर्यंत तीनही भिंती काव्यांन सनाथ झाल्या. अगदी बारीक अक्षरात कोरून सुद्धा कागद संपला ! चार दिवस पुढं काय करावं या विचारात गेले.

त्या दिवशी सक्तमजुरीच्या कामावर बाहेर पडल्यावर कळलं, तरूंगाला रंग देताहेत. क्रमाक्रमानं सर्व बराकी रंगवणार आहेत. आणखी दहा बारा दिवसांनी आपल्या कोठडीचा क्रम यायचाय. दोन दिवस रंग देण्यासाठी आपली कोठडी बदलणार. विनाटकाला इष्टापत्तीच वाटली ही.

त्या रात्री लेखन बंद झालं. पाठांतर सुरू झालं. आठ दिवसात वैनायक वृत्तातलं ते सर्व काव्य मुखोद्गत झालं.

दोन-चार दिवस दुसऱ्या कोठडीत राहून आपल्या कोठडीत परतला. रंगववलेल्या भिंती नव्यांन पुन्हा सामोरी आल्या. काव्याची निर्मिती पुढे चालू झाली.

शिक्षा संपली. कमला काव्य खऱ्या कागदावर खऱ्या शाईनं पुन्हा लिहिलं गेलं. रसिकांपर्यंत पोहोचलं.

काव्याचं नाव होतं कमला.

आणि कर्त्याचं होतं-

स्वा. विनायक दामोदर सावरकर.

खरचं,

क्रियासिद्धिः सत्वे वसति<br>महताम् । न उपकरणे ।

लोकोत्तर पुरूषांची क्रियासिद्धी त्यांच्या परक्रमावर, स्वत्वावर अवलंबून असते,

उपकरणांवर, साधनांवर नाही !


□

---

**सौ. सुलभा वसंत जोगळेकर**<br>ज्ञानसागर सोसा., मुद्रे खुर्द, कर्जत<br>जि. रायगड

---

**श्वास ज्याचे मेघ झाले बरसले रक्तातुनी, फुलविले उद्यान ज्याने हासऱ्या जखमातुनी.**




# फुटबॉलटच्या महायुद्धात फ्रान्सची जीत!

– मिलिंद ढमढेरे

शेवटच्या क्षणापर्यंत रोमहर्षक ठरलेल्या लढती, दिग्गज व बलाढ्य संघांना स्वीकारावा लागलेला धक्कादायक पराभव, अनुभवी खेळाडूंनी केलेली निराशाजनक कामगिरी यामुळे या शतकातील अखेरची विश्वचषक फुटबॉल स्पर्धा वैशिष्ट्यपूर्ण ठरली. आक्रामणापेक्षा मधल्या व बचावफळीतील खेळाडूंच्या ताकदीवर एखादा संघ जगज्जेता होऊ शकतो हे फ्रान्सने दाखवून दिले. अनेक माजी विजेते संघ उपांत्य फेरीपूर्वीच गारद झाल्यानंतर ब्राझीलचा संघ पाचव्यंदा विश्वचषक जिंकणार अशी अनेकांची खात्री पटली होती. तथापि साखळी गटापासून प्रत्येक सामन्यात विजय मिळविणाऱ्या मिळविणाऱ्या फ्रान्सने अंतिम लढतीत ब्राझीलची मस्ती जिरवली आणि अनेक फुटबॉल पंडितांचे अंदाज चुकविले.

चार वेळा अजिंक्यपद मिळवणारा ब्राझीलचा संघ यंदाही विश्वचषकाचा प्रमुख स्पर्धक मानला गेला होता. तीन वेळा जगज्जेतेपद मिळविणारा इटली, माजी विजेते अर्जेन्टिना, जर्मनी, इंग्लंड, ऑलिपिंक सुवर्णपदक विजेता नायजेरिया, आंतर क्लब स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा समावेश असलेला स्पेन हे संघ ब्राझील संघास आव्हान देतील असा अंदाज होता. परंतु फ्रान्सचा संघ यजमानपद भूषविताना अंजिक्यपदही घेणार असा अंदाज फारसा कुणी केला नसेल. तथापि फ्रान्स संघाने साखळी गटातील तीनही सामने जिंकले. पण त्यानंतर फ्रान्सने दुसऱ्या फेरीत पॅराग्वे, उपांत्यपूर्व फेरीत इटली. उपांत्य फेरीत क्रोएशिया यांच्यावर मात करीत अंतिम फेरी गाठली. बेबेटो, रोनाल्डो, डूंगा, रिव्हाल्डो यांच्यासारखे दिग्गज खेळाडू असलेला ब्राझीलता संघ सहज विजेतेपद पटकविणार असे वाटले होते. तथापि फ्रान्सच्या 'पोलादी' बचावफळी पुढे त्यांच्या 'आक्रमक'चालींचा सपशेल धुव्वा उडाला. पण त्याचबरोबर ब्राझीलच्या बचावफळीत किती शिथिलता आहे याचा प्रत्ययही फ्रान्सने घडविला. मधल्या व बचावफळीतील खेळाडूंच्या कामगिरीवर आपण


शेवटपर्यंत अपराजित्व ठेवून



नव्या नव्या पुरूषार्थासाठी सदैव आहे मनात हिम्मत, नव्या जगाच्या उदयासाठी पडेल ती ती चुकवू किंमत

जगज्जेता होऊ शकतो हे फ्रान्सने दाखवून दिले.

विश्वचषकाच्या इतिहासात प्रथमच अंतिम फेरी गाठताना फ्रान्सने मिळविलेले हे नेत्रदीपक यश म्हणावे लागेल. यापूर्वी त्यांनी तिसरा क्रमांक पटकावला होता. या विजेतेपदामुळे फुटबॉल क्षेत्रात फ्रान्सचे महत्त्व वाढणार आहे. विशेषतः व्यावसायिक पद्धतीने होणाऱ्या आंतरक्लब स्पर्धांसाठी अव्वल दर्जाच्या खेळाडूंना आपल्या क्लबबरोबर करारबद्ध करण्यासाठी अनेक क्लबचे ज्येष्ठ पदाधिकारी विश्वचषक स्पर्धांच्यावेळी तळ ठोकून बसतात आणि चांगल्या, होतकरू, नैपुण्यवान खेळाडूंना आपल्याकडे ओढण्यासाठीही त्यांच्यात अहमहिका निर्माण होते. विश्वविजेतेपदामुळे फ्रान्सच्या खेळाडूंना चांगला 'भाव' मिळणार आहे. तसेच अन्य काही देशांचे खेळाडूही फ्रान्सचे नागरिकत्व स्वीकारण्याचा प्रयत्न करतील. फ्रान्सचा अंतिम फेरीतील शिल्पकार झिनेदीन झिदान हा मूळचा अल्जीरियाचा नागरिक परंतु



फ्रान्सचा झिनेदीन झिदान




फुटबॉलमध्ये कारकीर्द घडविण्यासाठी तो फ्रान्समध्ये आला आणि त्याने सारे जग जिंकले.

इंग्लंड व ट्युनिशिया या संघांच्या समर्थकांमध्ये झालेल्या चकमकीमुळे या स्पर्धेस गालबोट लागले. परंतु याचा अपवाद वगळता सव्वा महिना चाललेल्या या स्पर्धांचे फ्रेंच संघटकांनी अतिशय नीटनीटके संयोजन केले. परदेशी संघांच्या पाहुणचारात ते कोठेही कमी पडले नाहीत. ६४ सामन्यांमध्ये कोणतीही अनुचित घटना घडली नाही. सर्वच सामन्यांना प्रेक्षकांचा अभुतपूर्व प्रतिसाद लाभला आणि फ्रान्सला या स्पर्धेतील सामन्यांचे थेट प्रक्षेपणाचे हक्क, जाहिराती, पुरस्कर्ते, तिकीट विक्री या माध्यमांद्वारे भरघोस उत्पन्न मिळाले.

फ्रान्सबरोबर क्रोएशियाने आगळी कमाई केली. जेमतेम पाच-सहा वर्षापूर्वीच स्वतंत्र राज्य म्हणून उदयास आलेल्या क्रोएशियाचा संघ प्रथमच या स्पर्धेत उतरला होता. आणि मुख्य फेरीसाठी पात्र ठरला होता. यंदा पदार्पण करताना क्रोएशियाने उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली. उपांत्य फेरीत प्रवेश करताना त्यांनी बलाढ्य जर्मनीला ३-० अशी धूळ चारली. ही त्यांची अनपेक्षित परंतु कौतुकास्पद कामगिरी म्हणावी लागेल. उपांत्य फेरीत कडव्या लढतीनंतर त्यांनी फ्रान्सकडून पराभव स्वीकारला. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात त्यांनी हॉलंडवर मात करीत कौतुकास्पद कामगिरी केली. या सामन्यात नोंदविलेल्या अप्रतिम गोलमुळेच त्यांचा खेळाडू डॉव्होर सुकेर याला 'सोन्याचा बूट' मिळाला. मुख्य फेरीत सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूस हा बहुमान मिळतो. हा बूट अंदाजे एक किलो वजनाचा असतो. क्रोएशियाला अंतिम फेरी गाठता आली नाही तथापि त्यांनी मिळविलेल्या ब्रॉन्झपदकामुळे मायदेशात या खेळांडूचे भव्य स्वागत

करण्यात आले. ‘आता जरी तुम्ही पराभूत झाला तरी पुढच्या स्पर्धेत तुम्ही नक्कीच अजिंक्य योद्धे होणार’असेच जणु काही त्यांच्या चाहत्यांनी आपल्या खेळाडूंना सुचविले.

**कमनशिबी इटली**

इटलीचा संघ यंदा विजेतेपदासाठी आव्हानात्मक संघ मानला जात होता. आतापर्यंत तीन वेळा अजिंक्यपद मिळविणाऱ्या इटलीने बाद फेरीत प्रवेश केला. परंतु नंतर फ्रान्सविरुद्धच्या सामन्यात पेनल्टी शूटआऊटस् मध्ये त्यांना पराभव पत्करावा लागला. पेनल्टी शूटआऊटस्वर पराभूत होण्याची ही त्यांची तिसरी वेळ आहे.१९९० मध्ये त्यांना असाच पराभव पत्कारावा लागला होता. १९९४ मध्ये अंतिम फेरीत ब्राझील संघाकडून त्यांना हार पत्करावी लागली. त्यावेळी त्यांचा हुकमी खेळाडू रॉबर्ट बॅजिओ याने पेनल्टी किक वाया घालविली होती. तर यंदा फ्रान्सविरूद्धच्या सामन्यात रॉबर्टचा भाऊ दिनो याने ही संधी गमावली हा एक योगायोगच म्हणावा लागेल.


इंग्लंडचा संघही पेनल्टीबाबत दुर्दैवी ठरला. अर्जेन्टिनाविरूद्धच्या लढतीत त्यांना पेनल्टी किकद्धारा पराभव स्वीकारावा लागला. त्यांच्या डेव्हीड बॅटी याने मारलेला फटका अर्जेन्टिनाचा गोलरक्षक कार्लोस रोआ याने शिताफीने अडविला. अर्जेन्टिला नंतर हॉलंडकडून निसटता पराभव स्वीकारावा लागला; तो डेनिस बर्वाकेन्च याने शेवटच्या मिनिटाला नोंदविलेल्या गोलमुळेच!




फ्रान्सचा लॉरेन्ट ब्लॅन्क ‘गोल्डन गोल’ करताना.

**गोल्डन गोल**

फ्रान्स व पॅराग्वे यांच्यातील दुसऱ्या फेरीचा सामना गोल्डनगोलच्या आधारे सोडविण्यात आला. या दोन तुल्यबळ संघांमधील सामना पूर्ण वेळेत गोलशून्य बरोबरीत सुटला. अलाहिदा डावाचा उपयोग करण्यात आला. नियमानुसार जर अलहिदा डावातही बरोबरी झाली तर अलहिदा डावात जो संघ पहिला गोल नोंदवले तोच संघ विजयी म्हणून घोषित केला जातो. या सामन्यात फ्रान्सचा लॉरेन्ट ब्लॅन्क याने अलहिदा डावात शेवटची सहा मिनिटे बाकी असताना गोल केला. या गोल्डन गोलमुळेच फ्रान्स विजयी ठरला.



**ब्राझीलचा लोकप्रिय खेळाडू‘रोनाल्डो’**

या स्पर्धांमुळे केवळ फ्रान्समध्ये नव्हे तर फुटबॉल खेळल्या जाणाऱ्या दोनशेहून अधिक देशांमध्ये फुटबॉलमय वातावरण झाले होते. ब्रॉझीलचा रोनाल्डो हा सर्वात लोकप्रिय खेळाडू मानला जातो. त्याच्यासारखी वेशभूषा करण्याबाबत अनेकांमध्ये चढाओढ निर्माण झाली. रोनाल्डो याने डोक्याचे मुंडन केले होते. अनेक चाहत्यांनीही त्याच्यासारखेच मुंडन केले होते. या स्पर्धेतील खेळाडूंचे पोशाख, संघाचे राष्ट्रध्वज यांना बाजारात चांगली मागणी मिळाली होती. गालावर डोक्यावर, खांद्यावर, पाठीवर

आपल्या आवडत्या देशांच्या खेळाडूंचे चित्र, देशाचा ध्वज रंगविण्यात प्रेक्षकांमध्ये विलक्षण चढाओढ दिसून आली. प्रत्येक सामन्याचे वेळी स्टेडियम म्हणजे रंगीबेरंगी फुलांनी नटलेला बगीचा वाटायचा. स्पर्धेच्या काळात आपल्या देशाच्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी त्या त्या संघाचे हजारो प्रेक्षक जगाच्या कानाकोपऱ्यातून आले होते. जपानचा संघ मुख्य फेरीत प्रथमच खेळत होता. जपानहून १५ हजार फुटबॉलरसिक फ्रान्समध्ये आले होते. रंगीबेरंगी कपडे घालून, चेहरे रंगवून, आपल्या देशाचे ध्वज हातात घेऊन आपल्या खेळाडूंना प्रोत्साहन देणारे प्रेक्षक बघून असे वाटत होते की यापेक्षा देशप्रेम ते वेगळे काय? प्रसंगी हे प्रेक्षक आपल्या देशासाठी हमरी तुमरीवरही येत होते आणि आपल्या देशाकडून गोल होताच तितक्याच आवेशाने ते जल्लोष करत होते.

'गर्वाचे घर खाली' अशी म्हण मराठी भाषेत सर्वांना परिचित आहे. रोनाल्डो व त्याचा ब्राझीलचा संघ यांना असाच अनुभव आला. अंतिम सामन्यापूर्वी दोन दिवस अगोदर रोनाल्डने खूप मेहनत केली. पण प्रत्यक्षात सामन्यापूर्वी दीड तास अगोदर तो अतिश्रमाने आजारी पडला. रोनाल्डोला इतकी प्रसिद्धी मिळाली होती की अंतिम सामन्याबाबत त्याच्यावर खूप मानसिक दडपण आले आणि त्यामुळेच तो आजारी पडला. खरं तर इथेच तुमच्या शारीरिक अन् मानसिक क्षमतेची खरी कसोटी लागते.

फुटबॉलमध्ये नव्वद मिनिटे आणि वेळ पडली तर त्यानंतरचा अलहिदा डाव असा दोन तासाहून अधिक वेळ खेळण्यासाठी प्रचंड शारीरिक आणि मानसिक क्षमतेची आवश्यकता असते. नियमित व्यायाम, पोषक आणि संतुलित आहार ठेवला तर शारीरिक क्षमता वाढते. तंदुरुस्तीही वाढते. फुटबॉल मध्ये 'हेडींग'ला म्हणजेच डोक्याच्या साहाय्याने गोल करण्यास महत्त्व असते. त्यासाठी आपले डोकेही मजबूत लागते. पेनल्टी शूटआऊटच्या वेळी गोल नोंदविण्यासाठी अचुकतेला खूप महत्त्व असते. तसेच त्यासाठी मनाची एकाग्रताही हवीच ! ब्राझीलविरूद्ध हॉलंडच्या दोन खेळाडूंनी द्विधा मनःस्थितीत गोल करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच त्यांना गोल नोंदविता आला नाही. याच 'पेनल्टी'च्या वेळी गोलरक्षकाचीही मोठी कसोटी असते. कारण साऱ्या प्रेक्षकांचे लक्ष त्याच्या कौशल्यतेकडे एकवटलेले असते.त्याने जर चूक केली तर त्याच्या सहकाऱ्यांकडून त्याची टवाळकी होणारच पण त्याचबरोबर प्रेक्षकही त्याची 'टिंगल' करण्याची शक्यता असते. ब्राझीलचा गोलरक्षक टॅफरेल याने हॉलंडविरूद्ध अतिशय एकग्रता दाखविली.

आपला प्रतिस्पर्धी संघ कितीही मोठा असला तरी आपणही त्याच्याविरुद्ध जिंकू शकतो, अशी जिद्द प्रथमपासून ठेवली तर यश सहजपणे मिळते हे फ्रान्सने दाखवून दिले. शेवटपर्यंत त्यांच्या खेळाडुंनी संयम दाखविला, आत्मविश्वास दाखविला. मध्यंतरापूर्वी दोन गोल नोंदविल्यानंतरही त्यांनी आपल्या खेळावरील नियंत्रण गमावले नाही. फ्रान्सचे मार्गदर्शनक एमी जॅक्वी यांना या स्पर्धेपूर्वी खूपच आपमानास्पद वागणूक मिळाली होती. विजय मिळवून देण्यासाठी ते योग्य नाहीत अशीही टीका झाली होती. पण शेवटपर्यंत त्यांनी या टीकेकडे दुर्लक्ष केले आणि संघास विजेतेपद मिळवून देण्याचे स्वप्न साकार केले. प्रयत्न केला तर अशक्य गोष्टीही साध्य होतात हे त्यांनी दाखवून दिले.

फुटबॉलमध्ये अव्वल दर्जाचे यश मिळविण्यासाठी खेळाडूला स्वतःच्या पायाच्या हालचालींवर नियंत्रण ठेवता आले पाहिजे. चेंडू स्वतःच्या पायाजवळ ठेवून प्रतिस्पर्ध्याला स्वतःच्या शरीरास झोके देत चकविता आले पाहिजे. चेंडू हवेतून आल्यानंतर तो छातीवर घेऊन त्यानंतर पायाने हा चेंडू तटविण्यासाठी नियमित सराव करणे आवश्यक आहे. फुटबॉलचे सामने पाहिल्यानंतर त्या खेळाडूंसारखे कौशल्य आत्मसात करण्यासाठी नियमितपणे मैदानावर गेले पाहिजे. या खेळाडूंपासून स्फूर्ती घेऊन आपणही चांगल्या दर्जाचे फुटबॉलपटू होण्याची जिद्द मुलांनी बाळगली तर खऱ्या अर्थाने हे सामने बघण्याचा फायदा झाला असे म्हणता येईल ▯


**मिलिंद ढमढेरे**
टेलिफोन भवनजवळ,
बाजीराव रोड, पुणे ३०

काळाच्या आरशावर आता, रोवा पाऊल येता जाता, आव्हाने नित घेत पुढे व्हा, नव्या युगाचे नारे गा.

# जीवाणू

**–डॉ. पुरुषोत्तम जोशी**

मी ? आहे एक जीवाणू! माझे शरीर एका पेशीचे बनलेले असून, पेशीची लांबी केवळ १ ते ३ मायक्रॉन इतकी लहान असते, आणि लहान असली तरी प्राणी म्हणून सर्वदृष्ट्या परिपूर्ण असते. माझे पेशीकेन्द्र आवरणाने आच्छादित किंवा बंदिस्त नसतो. त्यातील डी.एन.ए. हे आम्ल पेशीरसामध्ये विखुरलेले असते. पेशीरस मात्र प्रसाच्या आवरणामध्ये बंदिस्त असतो. एवढेच नव्हे तर त्याच्या बाहेर आणखी एक आवरण किंवा भित्तिका असते. या भित्तिकेमध्ये ''मूरिन्ह'' (murein) नावाचे नत्रयुक्त कर्बोदक (carbohydrate) असते मी माझा आहार स्वतः तयार करू शकत नसल्यामुळे मला माझी भूक भागविण्यासाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. मी मेलेल्या वनस्पती अथवा त्यांचे कुजू लागलेले भाग यांच्यावर विशिष्ट प्रकारचे विकर सोडतो. हे विकर कुजू लागलेल्या भागावर रासायनिक प्रक्रिया करून त्याचे लहान लहान परमाणूंमध्ये रुपान्तर करतात. रूपान्तरित परमाणू हाच माझा आहार होय. मी प्रजननासाठी द्विप्रभंजन प्रजनन पद्धतीचा उपयोग करतो. यांत शरीर पेशीचे दोन पेशींमध्ये डी.एन.ए. आम्लासहित विभाजन होते. विभाजित झालेल्या दोन्ही पेशी वाढतात आणि स्वतंत्रपणे जीवण जगू लागतात. माझी, स्वतःचा आहार स्वतः तयार करू शकत नसलेली काही भावंडे परोपजीवी म्हणून जिवंत प्राण्यांच्या शरीरावर किंवा शरीरामध्ये आश्रय घेतात आणि तेथील पेशींवर उपजीविका करतात. परोपजीवी असणारी ही माझी भावंडे ज्यांच्या आश्रयावर जगतात त्यांना दुखवतातच असे नाही. काहींचा आश्रयदात्यावर काहीच परिणाम होत नाही. काही तर आपल्या आश्रयदात्यांना या ना त्या प्रकारची मदतच करतात. जे प्राणी शाकाहारी आहेत त्यांना वनस्पती पेशींच्या भित्तिकेतील सेल्युलोज या कर्बोदकाचे पाचन करता येत नाही. अशावेळी सेल्युलोजचे विघटन करण्याची क्षमता असलेले जीवाणू त्यांच्या पोटात असतील तर ते सेल्युलोजवर रासायनिक प्रक्रिया करून पाचनास योग्य अशा अवस्थेत आणून ठेवतात. साहजिकच शाकाहारी प्राणी मग सेल्युलोजचे पाचन करतो. माझी काही भावंडे मात्र त्यांच्या आश्रयदात्यांना हानी पोहोचवतात. अशा भावंडांमुळे आश्रयदात्यांना विषबाधा किंवा एखादा जीवघेणा रोग होण्याचा संभव निर्माण होतो. अशा जीवाणूंची शरीरामध्ये संख यात्मक वाढ प्रचंड झाली तर रोग होतोच. क्षय, घटसर्प, प्लेग, कॉलरा, जीवाणूजनिक हगवण,




गोलाणूचे चित्र

महारोग, टायफॉईड, डांग्या खोकला अशा अनेक रोगांचा प्रादुर्भाव माझ्या भावंडांकडून होत असतो. मी रोगांचा प्रसार करीत नाही; माझी अनेक भावंडे करतात. आमच्यामध्ये फरक कोणता आणि तो ओळखायचा कसा? हा प्रश्न तुमच्या मनामध्ये निश्चितच आला असेल. माझ्या भावंडांमधला फरक ओळखण्यासाठी शास्त्रज्ञांच्या जवळ अनेक कसोट्या आहेत. त्या सर्वांची चर्चा मी येथे करणार नाही. परंतु एक सोपी कसोटी सांगणार आहे. अनेक रोगांचा अभ्यास करीत असताना शास्त्रज्ञांना असं आढळलं की, विशिष्ट रोगाला किंवा रोगांना कारणीभूत असणाऱ्या जीवाणूला विशिष्ट आकार असतो. त्या आकारावरून त्यांच्यामध्ये फरक करता येतो. काही भावंडं एकत्र येऊन विशिष्ट प्रकारची साखळी करतात, किंवा एखाद्या विशिष्ट आकाराचा गट तयार करतात. त्या साखळीच्या किंवा गटाच्या साह्याने फरक करता येतो आणि त्यावरून त्यांची ओळख होते. माझ्या शरीराचा आकार गोल (चेंडूसारखा) आहे. त्यामुळे मला शास्त्रज्ञ गोलाणू (coccus) म्हणून ओळखतात. माझ्या काही भावंडांचा आकार लंबगोल असतो त्यांना शास्त्रज्ञ दण्डाणू (bacillus) म्हणतात. काही जणांचा आकार उलगडलेल्या स्प्रिंगसारखा किंवा नागमोडी सरपटणाऱ्या सापासारखा असतो. त्यांना 'सर्पिली' असे नाव आहे. गोलाणू असणारे जीवाणू जेव्हा जोडगोळीने (दोन, दोन असे)वावरतात त्यांना जोड (द्वि) गोलाणू (Diplococcus) म्हणतात. जे चार, चार एकत्र येऊन गट करतात त्यांना चौ-गोलाणू (Tetra

प्रणिमात्र ह्या जगती व्हावा सर्वसुखी अन् निरोगीही, शुभ व्हावे सर्वांचे देवा, दुःख नसावे कुणांसाठी

coccus) म्हणतात . अनेकजण एकत्र येऊन लांब वा छोटीशी साखळी करतात, त्यांना जीवाणू-फीत (strepto coccus) म्हणतात. तर ज्यांच्या गटामध्ये एकत्र राहणाऱ्या जीवाणूंची संख्या बरीच मोठी- (मोजण्याचा कंटाळा येईल इतकी) असते, त्यांना द्राक्ष-घड-जीवाणू (staphylococcus) म्हटल जात.




माझी आणि माझ्या भावडांची जीवनकथा सांगत बसलो तर वेळेचे भान राहणार नाही. वेळेचे भान हवेच म्हणून आता थांबतो. आशा नव्हे विश्वास आहे की मी दिलेली ही माहिती तुम्हाला निश्चिपणे आवडेल!

बाय!

**डॉ. पुरूषोत्तम जोशी**
गृहप्रकल्प ११, लोकमान्य हॉस्पिटलसमोर, एरंडवन, पुणे ४.

# पुण्यश्लोक अहल्याबाई



मराठ्यांच्या इतिहासात ज्या अनेक थोर स्त्रिया झाल्या त्यापैकी एक अहल्याबाई होळकर होत. २१ ऑगस्ट ही अहल्याबाईंची पुण्यातिथी. महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील चोंडी या गावी इ.स. १७२५ च्या सुमारास अहल्याबाईंचा जन्म झाला.

डोळ्यात कर्तृत्वाची चमक आणि अतिशय साधी राहणी असलेल्या अहल्येचा विवाह इंदौर संस्थानचे संस्थापक मल्हारराव होळकरांच्या खंडेरावाशी इ. स. १७३३ मध्ये, वयाच्या ८ व्या वर्षी झाला. छंदीफंदी व व्यसनी असलेल्या खंडेरावाला इ. स. १७५४ मध्ये सुरजमल जाटाबरोबर कुंभेरी येथे झालेल्या लढाईत गोळी लागून मृत्यू आला. त्यामुळे मल्हाररावांनी सारी भिस्त आपल्या लाडक्या सुनेवर टाकली.

कर्तबगार सासरा आणि धार्मिक, करारी वर्तनाची सासू यांच्या सहवासात अहल्याबाईंना बाळबोध वाचन आणि मोडी लेखन यांचे शिक्षण देण्यात आले होते.मल्हाररावांनंतर इंदौर संस्थानची जहागिरी अहल्येचा मुलगा मालेराववर आली. परंतु तोही वयाच्या २२ व्या वर्षी मरण पावला. तुकोजा हाळकरकड फाजचा जबाबदारी सोपवून तिने नर्मदाकाठी महेश्वर येथे राजधानी केली. अहल्याबाईबरोबर लढण्यासाठी रघुनाथराव पेशव्याने ५० हजार फौजनिशी उज्जयनीनजिक अंकपात घाटावर मुक्काम केला. परंतु तिनेही लढायची तयारी केल्यावर, बाईकडून पराभूत होण्यापेक्षा राघोबा समझोत्यासाठी अहल्याबाईंना इंदौरला भेटायला गेला. तिचे आदर्श जीवन बघून राघोबा मनातल्या मनात खजिल झाला.

अनेक लढायांच्या वेळी अहल्येने आपल्या धैर्याचे व मुत्सद्देगिरीचे दर्शन घडविले होते. अहल्याबाईंना पंडिताची आणि पांडित्याची कदर होती. विद्वान, वैद्द, ज्योतिषी यांच्या योग्यतेप्रमाणे त्या त्यांचा आदरसत्कार करीत असत. अनेक देवळांचे जीर्णोद्धार तसेच घाट, धर्मशाळा, विहिरी, अन्नछत्रे यांची उभारणी केल्याने आजही त्यांची स्मृती जागी आहे.

अहल्याबाईंची करपद्धती अगदी सौम्य होती. पाटील, कुलकर्ण्यांच्या हक्कांचे तिने संरक्ष ण केले. महत्त्वाच्या ठिकाणी लायक अधिकारी नेमले. उपद्रव देणाऱ्या डोंगराळ भागातील लोकांशी गोडीगुलाबीने वागून त्यांना वठणीवर आणले. भिल्ल, गोंड यांचेकडून पडीक जमिनी घेऊन त्यावर लागवड केली. अशा अनेक कार्यांनी त्यांचे कर्तृत्व उजळून निघत होते.

मात्र सत्तरी गाठलेल्या अहल्याबाईंना कौटुंबिक दुःखाने पोळल्यामुळे, शेवटी शेवटी राजकारणातही रस वाटेनसा झाला. इ. स. १७९५ च्या ऑगस्ट महिन्यात त्यांनी देह ठेवला.


स्वाती ढेकणे
वायरलेस कॉलनी, औंध ७.

पदोपदी अपमान होतसे दुष्टांच्या संसर्गाने, अग्नीलाही घाव घणाचे लोखंडाच्या संगतीने.

# तेथे कर माझे जुळती

आज २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असताना विज्ञानाची सर्वच क्षेत्रातील प्रगती अत्यंत झपाट्याने होत असताना दिसते आहे. इंटरनेटच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या माहितीचा खजिना जतन करतो येतो आहे. त्यातून प्रगतीचे अनेक मार्ग सापडत आहेत. पण या विज्ञानयुगात एक क्षेत्र मात्र अगदी अपवादात्मक आहे की, जिथे संगणकाचा उपयोग अपुरा ठरतो. पुस्तकी ज्ञान कमी पडते. हे क्षेत्र म्हणजे भारतीय संगीत क्षेत्र! भारतीय संगीताचे ज्ञान हे गुरूमुखातूनच शिष्यापर्यंत पोहोचवावे लागते आणि ते देखील वर्षानुवर्षाच्या तपश्चर्येतून, साधनेतून आणि अथक परिश्रमातून. आपल्या पूर्वजांनी खूप निरीक्षणातून, सततच्या अभ्यासातून, निसर्गाच्या हालचालीतून सप्तस्वरांचा शोध लावलेला आहे. म्हणूनच भारतीय शास्त्रीय संगीत हे एक अजरामर झालेले शास्त्र आहे. परदेशीयांनाही याचे सतत आकर्षण वाटते आहे.

आपल्या संस्कृतीत, संगीताचे शिक्षण घेण्यासाठी गुरूगृही राहून अध्ययन करण्याची पद्धत होती. यामध्ये शिष्याने गुरूची सेवा करून विद्यार्जन करणे अपेक्षित असे. सतत सान्निध्यात राहिल्यामुळे शिष्यातील सर्व गुणदोष गुरूंना समजत असत. त्याला कोणत्या प्रकारचे शिक्षण पेलू शकेल याचा अंदाज येत असे. इतर कोणतेही व्यवधान नसल्याने गायन (किंवा कोणतीही कला) अंगात पुरेपूर



गुरूवर्य श्री. गंगाधरबुवा पिंपळखरे

*गुरु देव जाणा, गुरु पूज्य माना*
*गुरु अर्थ देती आपुल्या जीवना ।*

*सत्य ते बोलावे, शील घडवावे,*
*सदाचरणाने, प्रिय सर्वा व्हावे ।*
*अशा सांगताती बोध वचनाना,*
*गुरु अर्थ देती आपुल्या जीवना ।*

*अज्ञान, अंधार दूर करोनिया,*
*ज्ञान प्रकाशाची ज्योत लावुनिया ।*
*उजळती नित्य, विवेक वचना,*
*गुरु अर्थ देती आपुल्या जीवना ।*

*ज्ञान या जगाचे, भल्या वाईटाचे,*
*आयुष्यभरात नीट चालण्याचे ।*
*देती जे आम्हाला, वंदु त्या गुरुंना,*
*गरु अर्थ देती आपुल्या जीवना ।*

भिनली जात असे. गुरूंची शिकवण, शिष्याची स्व-प्रतिभा, रियाज, मेहनत यातूनच अलौकिक असे गायक निर्माण झालेले दिसत. फक्त संगीताच्या क्षेत्रातच नव्हे तर, शिक्षण क्षेत्रातही गुरूंना देवस्थानी मानण्याची पद्धत होती. 'हल्ली शिक्षणाचा बाजार मांडला जातोय' असं नेहमी म्हटलं जातं, पण म्हणजे नक्की काय होत आहे? तर गुरू आणि शिष्यातलं नातं संपुष्टात येत आहे आणि एकदा ते नातं संपलं की उरतो फक्त शंभर टक्के व्यवहार! विद्यार्थी व शिक्षकाचा संबंध फक्त एक तासाचा. बांधिलकी फक्त पालकांनी दिलेल्या फी पुरती! पूर्वी 'गुरूदक्षिणा' ही विद्यार्थ्यांच्या पूर्ण शिक्षणानंतर दिली जायची. विद्यार्थ्यांवर त्यांच्या आईवडिलांपेक्षा जास्त गुरूंचा अधिकार असायचा. एकदा एका गुरूंनी आपल्याला डावललं तर दुसरे कोणीही आपल्याला दारातही उभं करणार नाहीत, ही भीती असे. गुरूंची जास्तीत जास्त मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न व्हायचा. त्यासाठी गाण्यावर खूप मेहनत घेतली जायची. गुरू आणि गुरूमाता (म्हणजे गुरूंची पत्नी) यांचे प्रेम, सहवास आणि शिक्षण या तिन्ही गोष्टींतून झालेला शिष्याचा सर्वांगीण विकास हा त्याला पुढील आयुष्यात मोठ्या जागेवर नेऊन सोडायचा. आता वर्षभर शिकूनही आपल्या 'सरांचे' नावही माहीत नसलेले किती तरी जण असतात.

'झी' टी.व्ही. वरील गाण्यांच्या स्पर्धा, त्याची बक्षीसे, त्याची प्रसिद्धी सर्वांनाच भारावून टाकत असते. पण तिथे गायलेले किती गायक नंतर

गाण्यासाठी माझ्यापाशी, नाही साळुंकीचा साद, शुद्ध भक्तीने तरीही आला, गाण्यात माझ्या प्रसाद.

'ऐकू' येतात ? ती झटपट अन् वरवरची प्रसिद्धी असते. याचा अर्थ या स्पर्धांमध्ये भाग घेऊन नये असे नाही. भाग जरूर घ्यावा कारण त्यातून लोकांसमोर गाण्यासाठी आत्मविश्वास येतो. फक्त ते शास्त्रीय दृष्ट्या आत्मसात करणे जरूरीचे असते. गायन हे मुळातून शिकले, त्यावर गुरूंचे पुरेसे संस्कार झाले तरच ते ऐकण्याजोगे प्रभावी होते.

आज मात्र ही गुरूपरंपरा फारच अभावाने दिसते आहे. पण मला मात्र त्या पूर्वीच्याच गुरूपरंपरेचा थोड्या प्रमाणात तरी अनुभव घेण्याचे भाग्य लाभलेले आहे. गेली आठ वर्षे मी श्री. गंगाधरबुवा पिंपळखरे यांच्याकडे संगीताचे शिक्षण घेतो आहे. म्हणूनच 'तेथे कर माझे जुळती' हे गुरुजींच्या ज्ञान मंदिरातील सर्वप्रथम दृष्टीस पडणारे शब्द, त्यांच्याच संदर्भात मला अधिक योग्य वाटतात.

आज वयाच्या ८८ व्या वर्षीही सकाळपासून रात्रीपर्यंत कधीही न कंटाळता, न चिडता, न त्रासता प्रसन्नपणे विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याचे व्रत गुरूजींनी चालविलेले आहे. माझ्या वैयक्तिक बाबतीत सांगायचे तर, माझा आवाज तयार करून घेण्यासाठी जी मेहनत घेतली आहे तेवढी इतर कोणीही घेतली नसती. गाणे शिकवीत असताना 'घड्याळ्यात किती वाजले आहेत ? आज तुझा वार आहे का ?' असे प्रश्न कधीही ऐकू आलेले नाहीत. एक तास पूर्ण झाला म्हणून तंबोरा खाली ठेवल्याचे कधीही आठवत नाही. आठड्यातून दोनच दिवस शिकविण्याची अट नाही की, फी बद्दल कधी वाच्यता नाही.

माझ्या गुरुजींचे स्वतःचे शिक्षणही अतिशय कष्टाने, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतच झालेले आहे. पहाटे उठून म्हशींच्या गोठ्यात काम करून, दुधाचे रतीब घालून त्यांनी पं.विनायकबुवा पटवर्धन यांच्याकडे गायनाचे शिक्षण घेतलेले आहे. बुवांची मैफल असली की, तिथे सतरंज्या टाकण्यापासून काम करायचे आणि तंबोरा घेऊन मागे साथीलाही बसायचे. अत्यंत परिश्रमातून शिक्षण घेतलेले असूनही गुरूजींच्या लेखी त्याचा उल्लेख मात्र अतिशय कौतुकमिश्रितच असतो. गुरूंबद्दलचे प्रेम आणि निष्ठाच त्यातून डोकावत असते. 'तेथे कर माझे जुळती' हे वाक्य गरुजींनी पं. विनायकबुवांच्या फोटोखालीच लिहिलेले आहे.

अतिशय ज्ञानी, विद्वान असूनही माझ्या गुरुजींना पाहिजे तेवढी प्रसिद्धी मिळालेली नाही. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यासाठी लागणारी आत्मप्रौढी मिरवण्याचा त्यांचा स्वभावच नाही. स्वस्तुती त्यांना मान्य नाही. आजच्या जाहिरातीच्या युगाशी त्यांनी जुळवून घेता आलेले नाही. अजून एक कारण म्हणजे, माझे गुरुजी हे हाडाचे शिक्षक आहेत. लहान मोठ्या सर्व वयोगटाच्या शिष्यांमध्ये ते अतिशय रमून जातात. शिष्य तयार करण्यात, त्यांना शिकवण्यात, त्यांची प्रगती पाहण्यातच त्यांना आनंद वाटतो. विद्यार्थ्यांना शिकविण्यापूर्वी ते स्वतः अभ्यास करतात. शिक्षक असतांनाही स्वतःला असे 'विद्यार्थी' म्हणून म्हणवून घ्यायलाही त्यांना आवडते.

'मी माझ्या विद्यार्थ्यांना हातचे काहीही राखून न ठेवता शिकवतो. त्यांनीही तेवढ्याच एकाग्रतेने, समरसतेने गायन फुलवावे, वाढवावे. शास्त्रीय संगीताचा वारसा जतन करावा', हे माझ्या गुरुजींचे सर्व विद्यार्थ्यांना कळकळीचे सांगणे आहे. मी माझ्याकडून तसा प्रयत्न करणारच आहे. गुरुजींचे त्यासाठी सदैव आशीर्वाद लाभावेत हीच परमेश्वरचरणी प्रार्थना !

**चि. अमोल निसळ**
स्टेट बँक कॉलनी
पर्वती दर्शन, पुणे ९.

**शोधा पाहू**

१) प्रत्येक वाहनावरील नंबरप्लेटवरून त्या वाहनाचे रजिस्ट्रेशन कुठले आहे ते कसे ओळखाल ?

२) R.T.O. या लघुरूपाचा विस्तार काय व त्याचा मराठीत अर्थ काय?

३) नंबरप्लेटवरील नंबरच्या रंगावरून वाहन खाजगी आहे की भाड्याचे हे कसे ओळखाल ?

ज्ञान द्यायला अनुभवाचं, गुरूसारखं मन हवं, गाणं गायला नवं नवं, निळ मोकळं आभाळ हवं!



# शोध सर्वोच्च शिखराचा

***नुकताच आपल्या महाराष्ट्राचा सुरेंद्र चव्हाण एव्हरेस्ट शिखरावर तिरंगा झेंडा रोवून आला आणि आपल्या प्रत्येकाला आपणच एव्हरेस्ट सर करून आल्याचा आनंद झाला. पण या सर्वोच्च हिमाशिखराबद्दल आपल्याला फारशी माहिती नसते. सुरेंद्र चव्हाणच्या कर्तृत्वाने एव्हरेस्ट पुन्हा आपल्याला जवळचा वाटू लागला आहे. म्हणून या शिखराच्या बारशापासून ते एव्हरेस्टवरील विजेत्यांपर्यंत, एक लेखमाला आपण या अंकापासून देत आहोत. छात्र प्रबोधनच्या वाचकांसाठी ही लेखमाला लिहित आहेत–***

***प्रा. प्र. के. घाणेकर***



सर जॉर्ज एव्हरेस्ट


एकोणीसावं शतक अनेक दृष्टींनी महत्त्वाचं ठरलं. एव्हाना जगातील बहुसंख्य प्रदेश, बेटं, वनाच्छादित प्रदेशांची थोडीफार माहिती पुढारलेल्या पाश्चात्यांना झालेली होती. उष्ण हवामानाच्या भारतीय उपखंडाच्या उत्तरेला असणाऱ्या हिमालयाच्या पर्वतराजीची ओळख हिंदुस्थानचे सत्ताधीश बनलेल्या ब्रिटिशांना झाली होती. जगभरातील असंख्य डोंगररांगांमध्ये हिमालयाची डोंगररांग जास्त उंच आहे, हेही त्यांच्या ध्यानी आलं होतं. त्यातच भारतीय उपखंडाची, व्यवस्थितपणे, शास्त्रीय उपकरणांचा वापर करून, मोजणी करून, तो सारा प्रदेश नकाशांकित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सातासमुद्रापलीकडून आलेल्या ब्रिटिश शासकांनी हाती घेतला होता.

इ. स. १८५० पर्यंत ७८१६.६ मी./२५६४५ फूट उंचीचे नंदादेवी शिखर हेच जगातील सर्वात उंच शिखर मानले जात होते. पण धवलगिरी शिखराच्या मोजणीनंतर मात्र १८५० पासून ८१६७.२ मी./ २६७९५ फूट उंचीचे शिखर सर्वोच्च मानले जाऊ लागले. एव्हाना कांचनगंगा शिखराची मोजणी झाली आणि तो मान ८५८५.७ मी./ २८१६८ फूट उंचीच्या कांचनगंगा

शैलराज तो उंच हिमालय अमुचा रक्षणकर्ता

शिखराला देण्यात येऊ लागला. नोव्हेंबर १८४९ ते जानेवारी १८५० या काळात जे ओ निकोल्सन याचे एच (h) नावाने नोंदलेल्या शिखराची पाहणी मोजणी कामे करताना कामाच्या सोयीसाठी पंधरावा क्रमांक (xv) त्याच शिखराला दिला.

बिहारमधील जारोल, मिर्झापूर, जंजिपती, लाडनिया, हरपूर आणि मिनाई या सहा ठिकाणांहून घेतलेल्या वेधांचा उपयोग करून नेपाळ-तिबेटच्या सीमेवर असणाऱ्या प्रदेशीतील शिखरांच्या उंचीची गणिते करण्याचे किचकट काम आता वेगात सुरू झाले होते. सध्या प्रचलित असलेल्या माहितीप्रमाणे हे काम करणारा, मोजणीदार राधानाथ सिकंदर धावत धावत आपले वरिष्ठ व त्यावेळचे सर्व्हेअर जनरल अ‍ॅण्ड्र्यू वॉघ यांचेकडे गेला. तोवर मोजमापे घेतलेल्या सर्व ज्ञात शिखरांपेक्षा अधिक उंचीचे शिखर (शिखर क्रमांक १५-[xv]) त्याच्या गणिती आकडेमोडींमध्ये आढळले होते.




ही उंची वेगवेगळ्या ठिकाणांहून घेतलेल्या वेधांप्रमाणे २८९९० फूट ते २९०२६ फूट भरत होती . पुढे ह्या शिखराची उंची २९००२ फूट अशी ठरविण्यात आलू. अर्थात ही उंची 'मीन' सी लेव्हल' म्हणजे सरासरी समुद्रसपाटीपासून धरण्यात आलेली होती.

१९५० नंतर सर्व्हे ऑफ इंडियाने, बी. एल्. गुलाटी या जिओडेसिक सर्व्हे ऑफ इंडियातील प्रकल्पाधिकाऱ्याने केलेल्या कामानंतर ही उंची अधिक अचूकपणे मोजून ती उंची ८८४८ मीटर म्हणजेच २९०२८ फूट असल्याचे निश्चित केले. आता हीच उंची जगभर प्रमाणभूत मानली जाते.

**सर्वोच्चशिखराचे नामकरण**

जगातील सर्वाधिक उंचीचे शिखर सापडल्यावर त्या शिखराला स्थानिक भाषांमध्ये (दक्षिणेस नेपाळी आणि उत्तरेस तिबेटी) काही नाव आहे का? याचा फारसा तपास करण्याच्या [illegible] नाव दिले जावे, असे मत बनले.

पहिला भारतीय सर्व्हेअर जनरल असलेला सर जॉर्ज एव्हरेस्ट नुकताच नोकरीतून निवृत्त झाला होता. त्याचा शिष्य आणि वारसदार बनलेला अ‍ॅण्ड्र्यू वॉघ आता ब्रिटिश इंडियाचा सर्व्हेअर जनरल बनला होता. त्याने सर जॉर्ज एव्हरेस्ट याने भारतीय उपखंडाच्या शास्त्रीय पद्धतीने मोजणी करून केलेल्या भरीव कामगिरी प्रित्यर्थ 'माऊंट एव्हरेस्ट' हे नाव सुचविले. माऊंट याचा अर्थ शैल किंवा शिखर.या नावाला फारसा विरोध कोणीच केला नाही. यापुढील काळात आणखी कोणतेही शिखर एव्हरेस्ट शिखरापेक्षा जास्त उंच असल्याचे न आढळल्याने जगातील सर्वोच्च शिखर १८६५ पासून 'एव्हरेस्ट' याच नावाने ओळखले जाऊ लागले. नेपाळ-तिबेट सरहद्दीवर २७°५९ १६ उत्तर अक्षांश आणि ८६°५५ ४० पूर्व रेखांश जेथे एकमेकांना छेदतात त्या जागी हा 'विश्वकळस' किंवा 'पृथ्वीचा तिसरा ध्रुव' आहे.

**एव्हरेस्टची पर्यायी नावे**

पाश्चात्य जगाने ज्या शिखराला 'एव्हरेस्ट' नाव दिले ते शिखर स्थानिक नेपाळी लोकांमध्ये 'सागरमाथा' म्हणून आणि तिबेटी लोकांमध्ये 'चोमोलुंग्मा' (जगन्माता किंवा जगाची आई) म्हणून ओळखले जात होते.

विस्तारवादी-आक्रमक-धूर्त चिनी राज्यकर्त्यांनी तिबेटवर आक्रमण करून

तो देश बळकावल्यावर अनेक तिबेटी नावांचे चिनीकरण करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून या शिखराला चिनी शासक 'कोमोलंगमा फेंग' या नावानेच संबोधतात.

चोमोउरी, छोलंग्बू, चोमो कंकर, ल्चौमौलंक्मा , चा-चा लुंग, मि-टी-गु-टीचा-पू-लोंग-ग्पा, जोमो लंग्मा,जोल्मो लंगमा, गांग-थोंग-थिंग-ग्याल-मो, गांग-री-जोमो-लुंगमा, देवधुंगा अशी नावे एव्हरेस्ट शिखराची स्थानिक प्रचलित नावे असल्याने अनेक संदर्भ एव्हरेस्ट संबंधीच्या साहित्यात नोंदलेले आढळतात.

मराठी साहित्यात एव्हरेस्टला 'गौरीशंकर' हे नाव काहीवेळा चुकीने वापरले जाते. तसे नाव गुंफून 'आज जिंकला गौरीशंकर...' अशी काही काव्यरचनाही झालेली दिसते. परंतु नेपाळ मध्येच ७१४४.५ मीटर/ २३४४० फूट उंचीचे 'गौरीशंकर' या नावाचे एक वेगळे शिखर आहे. एकच नाव दोन ठिकाणांना (त्याही जवळजवळ असणाऱ्या शिखरांना) देण्याचा प्रघात नाही. त्यामुळे गोंधळ निर्माण होतो, म्हणून एव्हरेस्टला 'गौरीशंकर' हे नाव वापरणे चुकीचे आहे.

काही हट्टाग्रही लोक मोजणीदार राधानाथ सिकंदर याच्या स्मरणार्थ एव्हरेस्ट शिखराला 'शैल राधानाथ' असे म्हणतात. पण मग प्रत्यक्ष मोजणी करणाऱ्या निकोल्सनचे श्रेय का नाकारायचे? या प्रश्नाला उत्तर नसते.

सर्वोच्च शिखरावर पाय ठेवणाऱ्या शेर्पा तेनसिंग आणि एडमंड हिलरी यांच्या नावांवरून हे शिखर 'तेनरी' किंवा 'एडसिंग' अशा पूर्ण नव्याने निर्माण केलेल्या नावावरून ओळखावे अशी सूचनाही काही जण करतात. पण मग १९२४ साली मॅलरी आणि आयर्विन ह्या जिद्दी ब्रिटिश गिर्यारोहकांनी आधीच तेथे पाय ठेवल्याचे पुढे मागे कधी सिद्ध झाले, तर हे नाव परत बदलावे लागेल. त्यामुळे ही कृत्रिम नावे कधीच कोणी मान्य केली नाहीत.

**सर जॉर्ज एव्हरेस्ट**

४ जुलै १७९० मध्ये ग्वेर्नव्हले या वेल्स परगण्यात ब्रॉक्नॉकशायर भागात जॉर्जचा जन्म झाला. त्याचे वडील ग्रीन विच व चेल्सिया येथील हॉस्पिटलचे सॉलिसीटर होते.


ब्रिटनमध्ये लष्करी शिक्षण पुर्ण झाल्यावर तो हिंदुस्थानात आला व बंगाल आर्टिलरीत सेकंड लेफ्टनंट म्हणून तो नोकरीस लागला. पुढे इंडोनेशियातील जावा बेटाची भौगोलिक माहिती जमा करण्यास, तो नोकरीचा भाग म्हणून गेला. तेथून परत आल्यावर १८१५ मध्ये सैन्याच्या बांधकाम व तंत्रशाखा (इंजिनिअरिंग डिपार्टमेंट) या विभागात तो रुजु झाला.

नंतर १८१८ मध्ये ट्रिग्नॉमेट्रिकल सर्व्हेचा 'चीफ असिस्टंट' आणि १८३० ते १८४३ या कालावधीत 'सर्व्हेअर जनरल'म्हणून त्याने नोकरी केली. 'ॲन अकाऊंट ऑफ द मेरिडिओनेल आर्क ऑफ इंडिया' हा त्याचा संशोधन ग्रंथ १८४७ मध्ये प्रकाशित झाला.

१८५६ मध्ये निवृत्ती घेऊन इंग्लंडला परतल्यावर त्याने थॉमस विगची मुलगी 'एमा' हिच्याशी लग्न केले. १८६१ मध्ये त्याला 'सर' हा बहुमानाचा किताब मिळाला. एमा आणि जॉर्ज याक दांपत्याला सहा मुले झाली, पण दुर्दैवाने त्यातील एकही जगले नाही. १ डिसेंबर १८६६ रोजी सर जॉर्ज एव्हरेस्टचा लंडन येथे मृत्यू सर जॉर्ज एव्हरेस्ट.

**प्रा. प्र. के. घाणेकर**
१०५ नारायण पेठ, पुणे ३०

**बघा बरं 'ठ' नी संपणारे शब्द तुम्हाला ओळखता येतात का?**




१. नदीचा तीर.
२. ह्याच्यामुळे फळे/पाने/फुले झाडावर राहतात.
३. मातीचे मडके ज्यात पाणी गार राहते.
४. एक आकडा.
५. एक अवयव
६. हा लावल्यावर काम होत नाही.

**सायली गानू ,**
९ वी, ज्ञानप्रबोधिनी

पूजनीय तो उंच हिमालय, पूज्य अम्हाला सागर हा, भव्यत्वाची साक्ष ज्यामध्ये, पूजा त्यांची करू महा.



# संग्रह करता करता शिकू या

— प्रा. विवेक पोंक्षे

**ही** गोष्ट आहे गंमतीची. माझा एक मित्र आहे. व्यवसायाने इंजिनियर. घरची परिस्थिती खूपच चांगली. मनात आणले तर हजारो रूपायांच्या वस्तू मोठमोठ्या दुकानांतून सहज खरेदी करू शकेल. पण रस्त्यावरून जात असताना त्याची नजर window shoping न करता कचरापेट्या, पानाच्या दुकानांभोवती पडलेले कागद यांच्याकडे रेंगाळत असते. या वयातही रस्त्यावर काड्यापेटीचा एखादा वेगळा छाप दिसला तर त्यावर झडप घालून तो उचलतो. त्या छापाने त्याच्या बालपणापासून जमवलेल्या संग्रहात एखादी छानशी अनमोल भर पडणार असते. बालपणी जडलेल्या संग्रह करण्याच्या या छंदाने आजही त्याला आनंद मिळतो.

तुमच्यापैकी अनेकांना तिकिटे, बिल्ले, काड्यापेट्यांचे छाप यासारख्या वस्तू गोळा करण्याचा नाद असतो. हीच तर संग्रहात्मक प्रकल्प करण्याची खरी सुरुवात असते. छात्र प्रबोधनच्या प्रत्येक सदस्याने संग्रह करायला शिकले पाहिजे. संग्रह कशाकशाचा करता येईल? सहज यादी करायची म्हटली तर केवढी मोठी यादी होईल, बघा तर खरं.

‘नाणी, तिकिटे, चित्रे, जाहिराती, प्रकाशचित्रे, व्यंगचित्रे, पत्रे, वंशावळी, काड्यापेट्या, दिवे, अवजारे, वाहनांच्या प्रतिकृती, नकाशे, खेळणी बाहुल्या, भांडी. कापडाचे नमुने, कीटक, शंख, शिंपले, अंडी, घरटी, ठसे, पाने, फुले, वनस्पतींचे इतर भाग, मातीचे नमुने, दगड, ध्वनिफिती, म्हणी, कविता, उतारे, शुभाषिते, वाक्प्रचार, विनोद, शब्दकोडी, बिया इत्यादी.

याशिवाय वेगवेगळ्या विषयांवरच्या माहितीचा संग्रह करणेही शक्य आहे. अशा उत्तम माहिती संग्रहाची चिकटवही एखाद्या संदर्भ पुस्तकापेक्षाही मौल्यवान ठरू शकते.

माहिती कोठून मिळवता येते ? पुस्तके, हस्तलिखिते, जुनी पत्रे, नियतकालिके, वृत्तपत्रे, फिल्म्स्, ध्वनिफिती, मुलाखती आणि व्याख्यानांतून माहिती जमा होत जाते.

वस्तू गोळा करण्यासाठी मात्र जास्त प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी आपला परिसर, निसर्ग याचे बारकाईने निरीक्षण करावे लागते. जुना बाजार, दगडाच्या खाणी, समुद्र किनारे, सहलींना गेले असताना तेथील प्रदेश येथून अनेक दुर्मिळ वस्तू जमा होतात. मला एक प्रसंग आठवतो आहे. एकदा मी माझ्या काही मित्रांसोबत मुंबईहून अरुणाचल प्रदेशापर्यंतच्या प्रवास केला. वाटेत आम्ही महाराष्ट्र, मध्यप्रदेश, ओरिसा, बिहार, बंगाल, आसाम या प्रांतांमधून गेलो. माझ्या एका मित्राने प्रत्येक राज्यातील एक तरी स्थानिक वर्तमानपत्र विकत घेतले. यातून सहजच एक छोटासा पण छान संग्रह त्याच्याजवळ झाला. एखादा संग्रह चांगला आहे हे कसे ठरवायचे ? तर पहिला निकष अर्थातच संग्रहाची संख्या हा राहील. पण बऱ्याचदा खूप मोठ्या संग्रहापेक्षा खूप वैविध्य असणारा संग्रह सहजच प्रभावी ठरतो. वैविध्याबरोबरच दुर्मिळ वस्तूंची संख्या हाही एक महत्त्वाचा निकष असतो. तिकिट संग्राहकांच्या दुष्टीने दुर्मिळ असणारी तिकिटे म्हणजे छपाईत चूक झालेली तिकिटे. दुर्मिळ वस्तू मिळविण्यासाठी खूप चिकाटी लागते. जसजसा तुमचा संग्रह वाढत जातो, तसतसे अन्य संग्राहक तुम्हाला काही दुर्मिळ वस्तू देऊ करतात.

नुसता संग्रह करून चालत नाही तर तो छानपैकी मांडावा लागतो. व्यवस्थितरित्या जपून ठेवावा लागतो. पाने, फुले कीटक यांना आर्द्रतेपासून जपावे लागते. अनेक वस्तूंना बुरशी लागण्याची शक्यता असते. या सगळ्या वस्तू एकीकडे जमा होत असताना तज्ञ व्यक्तीकडून त्या सांभाळाव्या कशा हेही शिकून घ्यावे.

पुण्यातील राजा केळकर संग्रहालय किंवा कीटक संग्रहालय यांची उभारणी एकेका व्यक्तीच्या छंदातून आणि अभ्यासवेडातून झाली आहे. तुमच्या परिसरात आदर्श ठरेल असे एखादे छान संग्रहालय तयार होऊ शकेल. खरे तर प्रत्येक शाळेत तुम्ही मुलांनी एकत्र येऊन संग्रहालये उभारली पाहिजेत. चला तर, सगळेजण काहीतरी जमवायला सुरूवात करू या! ▯

हाच जीवनाचा खरा आहे निखळ आनंद, उत्साह नि उद्योगाचा परि हवा नित्य छंद.



# फिनिक्स

**– प्रा. शैलजा देशमुख**

रात्रीची वेळ होती. मनोजच्या त्या अस्ताव्यस्त खोलीत संगणकाच्या पडद्यावर graphics च्या वेड्यावाकड्या रेघा दिसत होत्या. टेबलासमोरील बिछान्यावर 'बिधु' वेडावाकडा पसरला होता. 'बिधु' मनोजने खटाटोप करून निर्मिलेला एक यंत्रमानव होता. वास्तविक मनोज हा काही मोठा कुशल शास्त्रज्ञ वा तंत्रज्ञ नव्हता. पण सर्वच विषयात त्याला रस होता. अन् गेली दहा प्रदीर्घ वर्षे ...एकाकी अवस्थेत घालवत असताना 'बिधु' त्याचा विरंगुळा बनला होता. 'बिधु' शिवाय मनोजचा संगणक हाही त्याचा दुसरा जोडीदार त्याच्याशी तो संभाषणातून संपर्क साधू शकायचा. आताही त्याने संगणक सुरू करून बोलायला सुरुवात केली.

''आज २० ऑगस्ट २०७४. मी मनोज रॉय स्वतःला पृथ्वीवरचा शेवटचा माणूस म्हणून जाहीर करीत आहे. तुला काही म्हणायचंय?''

थंड भावनारहीत यांत्रिक आवाजात संगणक म्हणाला, ''माझ्या माहितीप्रमाणे अजून पाच हजार चारशे एकोणतीस माणसं पृथ्वीवर जिवंत आहेत.

गेली दहा वर्ष मी या तळघरात राहातोय.दर आठवड्याला अन्न आणि पेट्रोलच्या शोधात बाहेर पडतो. पण मला तर एकही माणूस भेटलेला नाही.''

''हे खरं आहे की तू कलकत्त्यातील शेवटचा माणूस आहेस. पण जगातील मात्र नक्कीच नाही.

''कलकत्ता म्हण; नाही तर जग म्हण! त्याने काय फरक पडतोय? कुणाचा कुणाशी संपर्क नाही; वाहतुकीच काही साधन नाही ; अन्न नाही, वीज नाही, पिण्यालायक भरपूर पाणी नाही; सूर्यप्रकाशाचं दर्शन नाही; सूर्यप्रकाशाचं दर्शन नाही; सर्वत्र एक भयानक शांतता... कुणी जिवंत असण्याची शक्यताच नाहीये!''

''अरे, तू नाही का जिवंत आहेस?''

मनोज असहायपणे धुसमुसत म्हणाला... ''कसलं हे जिणं? डब्यातील साठवेललं अन्न खाऊन कसाबसा जिवंत आहे, झालं! जनरेटरसाठी पेट्रोल शोधायला पेट्रोलपंप धुंडाळावे लागतात.'' ''तरीही तू जिवंत आहेस! मग तुझ्यासारखे इतरही असतील की!''

''तू मला खोटी आशा का दाखवतोयस? तू काही साधासुधा संगणक नाहीस.तुझ्यावर मी काय म्हणून विश्वास ठेवावा? कुणास ठाऊक खोटं बोलायलाही शिकला असशील. तुझी ही मूर्ख बडबड मी उगीचच ऐकतोय!

''उगीच नव्हे, तुला सोबत हवीय म्हणून!

''हे बघ, तुझ्या सोबतीवाचून माझं अडलंय असं समजू नकोस. माझ्या सोबत 'बिधु' आहे. अगदी बुद्दू आणि पूर्णतः कार्यक्षम नसला तरी कधीतरी मी त्याच्यावरील काम पूर्ण करीनच.''

''तू कमी का प्रयत्न केले आहेस? तरीही तो आपला बुद्दू तो बद्दुच राहिलाय. त्यापेक्षा जगात तुझ्यासारखी जी इतर जिवंत माणसे आहेत त्यांच्याशी संपर्क साधायला तू का तयार नाहीस ?'' ''कारण मला माहितेय मी जगातील शेवटचा माणूस आहे.'' रागारागाने संगणक बंद करून मनोज बिधुजवळ गेला. त्याला वेगवेगळ्या स्थितीत बसविण्याचा यत्न करू लागला. बिधु इतका वजनदार होता की त्याला बसवणं मनोजला जमत नव्हतं तो पुन्हा पुन्हा पडत होता. अखेर मनोजने त्याला आरामखुर्चीत सरळ बसतं केलं आणि बटण दाबून आज्ञा दिली.

"X219" कार्यरत होण्याची प्रक्रिया सुरू कर!''

बिधु यंत्रवत् म्हणाला–''कार्यरत

भूतकाळाचे वैभव पुन्हा दावील जगता. रंजलेल्या, गांजलेल्या होईल हा ध्वज माता.

होण्याची प्रक्रिया सुरू होत आहे. सर्व यंत्रणा कार्यरत, उजव्या बाजूला काहीतरी चूक.''

मनोज मनात चरफडला. 'म्हणजे आता पुन्हा हा धडपडत, उजव्या बाजूला लंगडत फिरणार!' पण आपल्याजवळ दुसरा इलाज नाही हे ओळखून तो गप्प बसला.

बिधु पुन्हा यंत्रवत् म्हणाला, ''सर्व यंत्रणा सुरू होत आहेत. दहा, नऊ,आठ, सात... दोन, एक, शून्य. यंत्रणा सुरू.'' बिधू उठला. यंत्रवत् हालचाली करीत मानवी आवाजात बोलू लागला; हॅलो मालक, मी आपल्यासाठी काय करू?''

''सुरूवातीला स्वयंपाकघर स्वच्छ कर.'' काही न सुचून मनोजने आज्ञा दिली.

''ओ.के.बॉस,'' म्हणत बिधु लंगडत लंगडत स्वयंपाकघराकडे पळाला. क्षणभरात आतून धडाडधूम... भांडी कोसळण्याचे, फुटण्याचे आवाज येऊ लागले. ''अरे बिधु, काय चाललंय काय तुझं?'' मनोज रागाने ओरडला. बिधु आतून ओरडला– ''बॉस स्वयंपाकघर साफ करतोय. पण नीट जमत नाही. कारण मला काही दिसत नाहीये.''

''आता काय झालं बाबा ?''

''अहो ही कढई डोक्यावर अडकलीय बॉस!

''अरे मूर्खा, मग ती डोक्यातून काढ.''

''जशी आज्ञा बॉस! खरचं की हो, आता मला चांगल दिसतंय!''

''मूर्ख कुठचा!''

''खरंय बॉस!'' लंगडत लंगडत बिधु आत निघून गेला.

गेली दहा वर्ष या बिधुला व्यवस्थित कार्यरत करायचा यत्न मनोज करीत होता. पण व्यर्थ! आणि दुसरा हा संगणक... खोटारडा कुठला! माणसं जगात जिवंत आहेत. गेल्या दहा वर्षात एकही मला भेटू नये? कसा विश्वास ठेवावा याच्यावर? असं वाटत असूनही काय करावं हे सुचत नसल्याने मनोजने संगणक सुरू केला.

''मनोज, संपर्क साधल्याबद्दल धन्यवाद!'' संगणकातून आवाज आला. ''ए, हे बघ पुन्हा तुझं खोटं रामायण लावू नकोस हं! बाहेर तापमान कसं आहे ते सांग!''

''कलकत्त्यात १३° सेल्सिअस, लंडनमध्ये ३०° सेल्सिअस, न्यूयॉर्कमध्ये....''

''अरे बाबा, हे सगळं मी कुठे तुला विचारलय?''

''बर ते जाऊ दे. तुझ्यासाठी एक बातमी आहे. तुझ्या घराजवळच सजीव माणसाची चाहूल मला लागलीय. यापूर्वी असं कधी घडलं नव्हतं. एक छोटा ११-१२ वर्षाचा मुलगा दिसतोय. तो आपल्या घराकडेच येतोय.''

मनोजचा संगणकाच्या सांगण्यावर कणभरही विश्वास बसला नाही. रागारागाने त्याने संगणक बंद करून टाकला आणि जोरात बिधुला हाक मारली.

''बॉस, ब्रेकफास्ट आणू का?'' बिधुने आतूनच विचारले.

''अरे मूर्खा आता संध्याकाळचे सात वाजलेयत.''

''सॉरी बॉस!''

''सारखं सारखं 'बॉस' म्हणणं बंद कर पाहू!''

''ठीक आहे बॉस!''

''पुन्हा तेच बिधु! हा संगणक म्हणतो तेच खरंय! तू अगदी मूर्ख आहेस. शेवटी यंत्रमानवच ना!''

''बॉस मी जेवण आणू का ?''

बिधुचे काम म्हणजे गोंधळ! हे जाणून मनोज नको म्हणाला. तेवढ्यात बाहेर दारावर टक्टक् केल्याचा आवाज आला. मनोजचा विश्वास बसेना. बिधुने दार उघडल्यावर ११-१२ वर्षाचा एक छोटा मुलगा पाठीवर एक सॅक घेऊन आत आला. त्याचे कपडे मळके होते आणि थंडीने तो कुडकुडत होता. बिधुला बघून त्याला गंमत वाटली. कारण त्याने आतापर्यंत यंत्रमानव पाहिला नव्हता. बिधुही त्याला पाहून खुश झाला. मनोजकडे पाहात असताना मात्र तो मुलगा अगदी रडकुंडीला आला. त्याला त्याच्या बाबांची आठवण झाली. गेल्या काही आठड्यांपासून ते बेपत्ता होते.

''मला थोडं पाणी मिळेल का हो काका?'' त्याने केविलवाणेपणाने विचारले. मनोजने त्याला पाणी दिले. मधल्या वेळात बिधुची कार्ययंत्रणा त्याने बंद केली होती. ''मुला, तुझं नाव काय?'' त्याने प्रश्न केला.

''जॉय रॉय!''

''अरे मी सुद्धा रॉयच, मनोज रॉय!''

निर्जीव दिसणाऱ्या बिधुकडे पाहात जॉयने उत्सुकतेने विचारले.

''काका, हा पुन्हा बोलेल ?''

''हो, थोडी खटपट केली तर!''

जॉयने आपली बॅग दिवाणवर ठेवली. त्यातून काही अन्नाचे डबे काढले. शेवटी एक स्विस मेकचा स्क्रू-ड्रायव्हर त्याच्या बॅगेतून निघाला. तो बघताच मनोजचे डोळे चमकले. खरं तर बिधुची दुरुस्ती करण्यासाठी असा स्क्रू-ड्रायव्हर त्याला बरेच दिवसांपासून हवा होता.

''जॉय, थोडा वेळ देणार का मला हा स्क्रू-ड्रायव्हर?''

जॉयला खरंतर तो मुळीच देण्याची इच्छा नव्हती. पण बिधु दुरूस्त होणार, पुन्हा बोलू लागणार या आशेने त्याने मोठ्या नाखुशीने तो स्क्रू-ड्रायव्हर मनोजला दिला. बरीचशी खटपट करून त्याने बिधुची कार्ययंत्रणा दुरूस्त केली.

'x-219 कार्यरत होण्याची यंत्रणा सुरू कर!'' त्याने आज्ञा दिली.

''कार्ययंत्रणा सुरू!'' बिधुच्या हालचाली पुन्हा सुरू झाल्या, मात्र पूर्वीपेक्षा जरा तरतरीतपणे.

...'व्यक्तिमत्त्व प्रोग्रॅम सुरू..'

अशी आज्ञा देताच बिधु डोळे चोळत उठला... 'मी कुठे आहे?' तो आता बुद्धीचा वापर करू लागला होता.

''तू आपल्या घरी आहेस.'' जॉय म्हणाला.

बिधु गोंधळला. त्याला काही समजेना. पण आता तो पूर्वीसारखा लंगडत नव्हता.

- मनोज काही या शास्त्रातील तज्ज्ञ नव्हता. फक्त गेली दहा वर्ष एकाकी वाटलं की बिधुची यंत्रणा चालू करून त्याच्या सहवासाचा तो लाभ घ्यायचा.

मनोजने कुतूहलाने जॉयला विचारलं ''तू इथे कसा आलास?''

'एका विशिष्ट प्रकारच्या प्रकाश किरणशलकांनी मला रस्ता दाखवला.'

हे काम नक्कीच अवकाशातील मुख्य संगणकाचं-आपल्याकडे असलेला संगणक त्याला जोडलेला आहे. हे मनोजला माहीत होतं?''

''जॉय, तू कुठे राहात होतास?''

'बरॅकपूर !'

म्हणजे एवढ्या जवळ असूनही आपल्याला समजलं नाही याचं मनोजला आश्चर्य वाटलं.

''काका, आम्ही काही इथे कायम राहात नव्हतो- तेव्हा आई होती. छोटी डॉली होती; माझा रॉकी कुत्रा होता-'' त्यांच्या आठवणीने जॉयचे डोळे भरून आले...आणि आता तर बाबाही हरवलेत... त्याची अवस्था पाहून मनोजने त्याला जवळ घेतले...

''जॉय, बाळा घाबरू नकोस. फार दूर गेले नसतील तुझे बाबा; फार दूर जाणं अवघड आहे, पेट्रोल अभावी.''

त्या दोघांचे आता बिधुकडे लक्ष नव्हते. पण तो हळूहळू संगणकाकडे सरकला होता. त्याच्याशी काही खटपट करून नंतर एक बटन त्याने दाबले.

संगणकातून आवाज येऊ लागला; ''मनोज, संपर्क चॅनल सुरू केलास, बरं झालं! आता तुझ्यासारखे इतर जे मानव जिवंत आहेत त्यांच्याशी तू संपर्क साधू शकशील.''

मनोज चकीत झाला. त्याने तर काहीच केलं नव्हतं. आता त्याचं लक्ष बिधुकडे गेलं. ''बिधु, म्हणजे तू...?''

बिधु हसत म्हणाला, ''येस बॉस! मीच तो चॅनल सुरू केला. आता मला अनेक गोष्टी स्मरतायत.''

संगणकावर आता जॉयसाठी संदेश आला.

- त्याच्या बाबांचा आवाज येऊ लागला; ''जॉय, माझा आवाज ऐसू येतोय ना तुला ?''

''बाबा, कुठे आहात तुम्ही ? ठीक आहात ना ? इकडे परत कधी येणार ?''

''जॉय, तू कसा आहेस ? तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे हळूहळू देईन.''

''बाबा, मी खुशाल आ हे - हे मनोजकाका आहेत ना, त्यांनी मला जेवण, पाणी, सर्व काही दिलंय. पण बाबा, तुम्ही या ना!''

''लवकरच येईन जॉय! पण आता मला तुझ्या मनोजकाकांशी बोलू दे.''

''हॅलो मनोज, जॉयची काळजी घेतोयस- खूप आभारी आहे तुझा!''

मनोज- ॲरिझोनामधील एका गुहेसारख्या 'फिनिक्स' नावाच्या ठिकाणी काही माणसं जिवंत आहेत असं मला समजंय... त्यांच्यात खूप शास्त्रज्ञ आहेत.ते आपल्यासारख्याच माणसांना संगणकाच्या साहाय्याने तिकडे कसं जायचं याचं मार्गदर्शन करतायत. आपणही तिकडे जाऊ या.''

''एकूण संगणक खोटं बोलत नव्हता तर.''

''नाही रे, मी त्यांच्याशी बोलतो सुद्धा! मी आता तुझ्या तिथे येतोच मग ठरवू काय करायचयं ते.''

''बाबा, कधी येताय तुम्ही जॉय

उत्सकुतेने म्हणाला. ''अगदी थोड्या मिनिटात....''

''काय मनोज, आता तरी माझ्यावर विश्वास ठेवून फिनिक्सवर जाणार ना ?'' – संगणकाचा आवाज आला. तेवढ्यात जॉयचे बाबा तिथे येऊन थडकले. ते गाडीतून आलेयत हे ऐकून जॉयला आनंद झाला.

''मनोज, आपण असे इथे किती काळ जगणार ? चल निघू या आता 'फिनिक्स'कडे अरे तिकडे छोटी मुलंही आहेत. तुझ्याजवळ खूप ज्ञान नसेल, पण वसंतातील हिरवी पालवी, चांदण्यांनी भरलेलं आकाश... खळखळ वाहाणारे झरे यातलं काही या मुलांना पाहायला मिळालं नाही... पुढे मिळेल की नाही कोण जाणे...पण ही स्थिती अशीच राहणार नाही...त्यांच्या पुढची.... कदाचित त्या पुढील पिढीला पुन्हा हे सगळं अनुभवायला मिळेल... आपण हे सगळं त्यांच्या स्मरणात जपायला हवं. साहित्यातून, कथा कवितातून... मनोज तुझ्याजवळ प्रतिभा आहे. हे सगळं तू जागं ठेवायला हवंस. चल आमच्या–बरोबर.''
''काका चला ना.''....जॉयनेही त्याला गळ घातली. ...त्याला नाराज करणं मनोजच्या जीवावर आलं.
''मनोज, माझं काम आता संपलंय, माझी यंत्रणा बंद करून टाक.''... बिधुचा आवाज आला.

''नाही रे बिधु, आता तर तू पूर्वीसारखा मूर्खही राहिला नाहीस...आणि असतास ना तरी... गेल्या दहा वर्षाच्या एकांतातला तू माझा सखा आहेस. तुला कितीही शिव्या घातल्या तरी तुझी मला सवय लागलीय.तुझ्याशिवाय मी जाणार नाही.

''ठीक आहे. कुणी सांगावं तुमच्या नव्या जगात माझाही काही उपयोग असेल.'' ''नक्कीच ! काही नाही तरी पंक्चर झालं तर गाडीचे टायर तरी बदलशील ?''

''नक्कीच बॉस !'' बिधु हसत म्हणाला.

बिधुच्या हातात हात घालू मनोज मनापासून हसला. तेवढ्यात संगणकाने त्याला टोकले... ''मनोज तुझ्यासाठी 'फिनिक्स'वरच्या लोकांचा संदेश आहे.''

भोवतालचा प्रकाश हळूहळू कमी होत गेला. संगणकाच्या पडद्यावर काही चित्रे दिसू लागली. एका धीर गंभीर आवाजाने सगळी खोली भरून गेली... पृथ्वीवर जिवंत असणाऱ्या सर्व मानवांनो...'फिनिक्स'वर आलात तर तुमचं स्वागत आहे.... सर्वत्र अंधार आहे. खूप मोठी रात्र पसरलीय... पण कधीतरी उजाडेल. ही स्थिती कायम राहाणार नाही... पुन्हा एकदा आपण पूर्वीचं जीवन नक्कीच अनुभवू.

'फिनिक्स' पक्षी जसा राखेतून उभारी धरतो तसेत आपणही एकत्र येऊ... हा आपला पुनर्जन्म समजू या. अवकाशातील मुख्य संगणक तुम्हाला अन्न, पाणी, निवाऱ्याचे ठिकाण दाखवेल. संकटाचा इशारा देईल. मानवतेच्या रक्षणासाठी सज्ज व्हा आणि या अंतिम प्रवासाला... 'फिनिक्स'कडे निघा. तुमच्यासमोर दिसणाऱ्या किरणशलाकेच्या मागोमाग या... हा प्रकाश तुम्हाला मार्ग दाखवेल... चला...उत्साह धरा... आपणा सगळ्यांना पुन्हा उभारी धरायचीय. नवीन जग उभं करायचंय !''


हळूहळू आवाज बंद झाला. मनोज, बिधु, जॉय आणि त्याचे बाबा भारल्यासारखे त्या प्रकाशामागे जाऊ लागले...

[]

(श्री. अभिजित सरकार यांच्या 'फिनिक्स या इंग्रजी कथेचा स्वैर अनुवाद.)

**प्रा. शैलजा देशमुख**
बी ७/५ गुरूराज सोसा.
पद्मावती पुणे ३७.





पावसाळी मुलखातल्या डोंगर रानाच्या उताराला खाचा पाडून तयार केलेल्या - शेतांमध्ये म्हणजे भातखाचरांमध्ये भाताचे पीक घेणे




**-प्रा. राम डिंबळे**

परवडते. कारण तिथे आयते पावसाचे पाणी वाहत येते.

म्हणूनच महाराष्ट्राच्या सह्याद्री पर्वताच्या मावळी उतारावर भाताची शेती केली जाते. मावळात आणि कोकणात भाताची खाचरं दिसतात ती इवलीइवलीशी. एकतर उतारावर मोठ्या लांबी रूंदीची खाचरे होतच नाहीत, आणि दुसरे म्हणजे दर पिढीला खाचराच्या वाटण्या होतात, तेव्हा त्यांचे आकार आणखीनच दुभंगतात. कोकणी शेतातल्या वाटण्या तर अगदी घोंगडी एवढ्या मापाच्या होत जातात. त्यामानाने आन्ध्रात व गोव्यात सपाटीवरची प्रचंड विस्ताराची सलग भातशेती पाहायला मिळते. कोकणात आणि मावळात मात्र डोंगरउताराशी झगडत शेते तयार करावी लागतात.

ही शेते लांबून व उंचावरून दिसतात मात्र सुंदर नक्षीसारखी.

या सुंदर शेतमाळेत भातापिकांची गुंफण करणं मात्र विलक्षण जिकिरीचे काम आहे.

शेतीचे अर्थशास्त्री अनुभवाने म्हणतात की, *'Paddy and poverty go hand in hand'* भाताची आणि गरिबीची अगदी जन्मगाठ आहे, असा त्याचा अर्थ. म्हणजे शेत तयार करण्यापासून पीक काढीपर्यंत कष्टच कष्ट करायचे, पण पिकातून कष्टाची बिदागी मात्र वसूल व्हायची नाही, अशी उलटी तऱ्हा!

भातशेतीच्या कष्टाचा कळस म्हणजे भाताची लावणी! पहिल्या पावसाला वाफ्यात बी पेरायचे आणि ते ८-१० इंच उंचीचे झाले की ते मुळासकट उचलून साऱ्या खाचभर शिस्तीने रोवून पुढे वाढवायचे हे भातशेतीचे खास तंत्र. भाताशिवाय दुसऱ्या कुठल्या पिकाला अशा फेरमांडणीची पद्धत नाही. जिथे एकदा पेरले तिथेच शेवटपर्यंत वाढवले असे 'पेरभात' करण्याची पद्धत काहीकाही ठिकाणी आहे. परंतु भाताची लावणी केल्याने पीक वाढते, असा अनुभव असल्याने सगळीकडे भातलावणीची पद्धत जास्त रूढ आहे.

भातरोपांची उचलबांगडी करण्याचे हे काम सोपे नाही. कारण ते ऐन आखाडझडीत करावे लागते. लावणी करायची तर संपूर्ण शेत चिखलणी करुन तयार करावे लागते.ही चिखलणी करुन तयार करावे लागते. म्हणजे ही चिखलणी शेतात पाणी तुंबवायचे आणि मग त्यात 'नांगरट' करायची. ही नांगरट फक्त तगड्या आणि चिवट औत्याचेच काम आहे.

सध्या खेडोपाडी तालमी उरल्या नाहीत. खेडोपाडी पिकणारे दूधही सोसायट्यांच्या हातून शंभर टक्के शहराकडे जाते. त्यात ज्याचा नाइलाज आहे, तोच शेतीत राहतो. त्यातही पोषाखीपणाची चटक वाढली आहे. अर्थातच उन्हापावसात मेहनत करू शकणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. वर्षभरात बैलजोडीला फक्त ७०-७५ दिवसांचे काम असले, तरी बैल सालभर तंदुरुस्त ठेवावे लागतात. त्यावर खर्च होतो. बैलही महाग झालेत. त्यामुळे प्रत्येकाशी स्वतंत्र बैलजोडी असण्याचे दिवस राहिले नाहीत. शेतातली बरीच कष्टाची कामे ट्रॅक्टरने करता आली तर पाहावी, असाही कल असतो. फक्त, लावणीचे काम काही बैलजोडीशिवाय होऊ शकत नाही. त्यामुळे लावणीच्या

उतरणीची चढण, झुडूपातलं वळण, राजवडीच्या मातीला, मोत्यांचे गुंफण.

दिवसात चिखली नांगर धरणाऱ्या औत्याला मागणी फार.

पोटरीपर्यंतच्या चिखलात रुतणारी नांगर पेलायला तशाच ताकदीचा गडी पाहिजे. बैलदेखील पोट खपाटीला गेलेले असून चालत नाहीत. तगडा गडी आणि ताकदीचे बैलदेखील दिवसभराच्या चिखलणीने पार वाकतो.मराठी शेतातली माती मोठी मस्तवाल असते. ती शेतकऱ्याला अक्षरशः घामच गाळायला लावते. त्यामानाने बिहार, उत्तरप्रदेशची नांगरट म्हणजे आयत्या पिठावर रेघोट्या ओढाव्या तशी वरवरची कुरवाळणी. मावळी भातखाचरात चिखली नांगरीमागे एकेक पाऊल रेटत जायचे तर भर पावसात घाम फुटतो. त्यात मातीत दगडाची कपची किंवा बाभळी करवंदीचा कराळ काटा असतोच. त्यांची भेट झाली म्हणजे अनवाणी पावलांचे हाल काही पुसू नका! मग तो औत्या रात्री बिब्बाचे शेवते पायावर घालून पाऊल चिंधोटीने आवळतो आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा चिखलात पाय घालतो. लावणी संपेतो त्याला औषधोपचाराचीही रजा परवडत नाही. हा कष्टकरी गडी नांगराचे रूमणे सांभाळतो आणि नांगराचा तोल जाऊ देत नाही की नांगराचे तास चुकू देत नाही. त्यात त्याला खाचरात कुठे कोणत्या खोलीला, एखादा अडेल गोटा नांगराला ऐनवेळेस गचका देऊ शकेल. याची नीट माहिति असावी लागते. नाहीतर ऐन घातवेळेला नांगराची दांडी तुटली किंवा फाळ फाफलला की संपलेच. गावच्या बलुत्या सुताराच्या सतरा विनवण्या करून नांगर बांधलेली असते. ती ऐनवेळी खुंटली की सुतार कुठे सापडायला! मेहनती शेतकऱ्याला आपल्या शेताचे इंजिनियरिंग अचूक समजते. भाताचे खाचर अचूक पाणसळीत आणणे हे औत्याचेच काम. कुठे चढ झाला किंवा कुठे खळी झाली म्हणजे भाताच्या सगळ्या चोथ्यांना सारखे पाणी मिळणार नाही. शेतात हवे तेव्हा समपातळीत पाणी पाहिजे आणि पाहिजे तेंव्हा ते सोडताही आले पाहिज, अशा रीतीने शेत सांभाळावे लागते.

गावची माणसं एकाजागी गप्पांना जमली म्हणजे अडाणी, दुबळ्या किंवा घळ्या शेतकऱ्याची कुचेष्टा करतात. ''काय ल्येका तुला साधी नांगरी झेपंना, का वावर सरळ ठेवता येइना, कसा रं परपंच करनार तू.'' असे त्याचे हसे करतात. जरा प्रगतशील शेतकरी चिखलात धैंचा गाडतात किंवा ग्लीरिसीडियाचा पाला भरतात. पण चिखल असा मऊ अन् एका तळीत करतात की जसं मऊ लोणीचं. वाफ्यातल्या माहेराहून हलवतांना दुखावलेली भातमुळं चिखलातल्या सासरी सहज रुजावीत म्हणून केवढा खटोपट!

भाताची लावणी करायची म्हणजे घिसाड्याच्या ऐरणीवर जशी लालमऊ लोखंडावर ताव असे तोपर्यंतच घाव घालायची घिसाडघाई करावी लागते तशातली गत. एकदा गाव लावणीला जुपलं की मधे थांबणं नाही. खाचरात पाणी होण्याइतकी आगोठीची पानझड वेळेत होईल याचा भरवसा नाही. एकदा पाणी झाले की सारा गाव लावणीला लागतो. म्हणूनच या



हंगामाला 'घात' म्हणतात. घातीच्या वेळेला मयत झाकून ठेवून सुद्धा काम हातावेगळे करावे लागते. तिथं सणवार, पैपाहुणा, आजारबिजार... अगदी विठ्ठलपांडुरंग सुद्धा बाजूलाच ठेवायचा. दरसाल पायवारी करणाऱ्या माळकऱ्याचेदेखील अर्धे चित्त विठूच्या पावलांखाली भात-खाचरातला चिखलच पाहात असते.

सगळेच गाव कामाला लागले की मजूर जागोजाग वाटले जातात. बाहेरून आणलेले मजूर महाग. गावात सुटे मजूर कमीच. मग अशा रोजानं कामाला जाणाऱ्यांच्या घरी गावचे भारीतले भारी शेतकरी सकाळसकाळी आर्जवं करायला जाणार. बरेच शेतकरी दोघा तिघांचा 'वारंगुळा' म्हणजे परस्पर सहकारी टोळी करतात. मग एकेकाची लावणी सगळे मिळून उरकतात. लावणीत रोजानं आलेल्या सर्वांना रोजाबरोबर गरमागरम भाकरी अन् सोबत लोणचं किंवा बोंबीलचटणीचं जेवण जागापोच मिळतं.

वरून पाऊस कोसळत असतो. आगोठीचं चावरं वारं, हुडहुडी भरवत असंत. वाफ्यातल्या रोपांचे 'मूठ' म्हणजे जुड्या एकत्र बांधून त्याचे ते ओले कच्चे हिरवे ओझे एका शेतातून

पेरनी पेरनी, आला धरतीचा वांस, वाढे शेतकऱ्यां पेरनीची तुझी आंस.

दुसऱ्या शेतावर बांधाबांधनं न्यायचं असंत. बांध निसरडे, वाटा वाकड्या, झुडपं अन् गवत जोरावलेलं अशा अवस्थेत दुईवर भारा घेऊन रान तुडवीत जाणाऱ्या मावळी बाईच्या कष्टाला तोड नाही.

रोपाच्या चारपाच काड्यांची जी एक जुडी करतात त्याला मावळात 'चोथा' म्हणतात. अशा चोथ्याला चिखलात खोचत लावणी करणारी व्यक्ती शेतात मागे सरकत जाते. इतर कुठल्याच शेतकामात काम करणाऱ्याची अशी 'पीछेहाट' होत नसते. भातशेती करणाऱ्याची आयुष्यातच जी पीछेहाट होते,

चिखलात चोथे खोचणाऱ्या माणसांची एक माळका अशी मागे मागे सरत जाते. वाकून कंबर मोडा –यला होते. म्हणून चिखलात बूड टेकण्यासाठी 'तिवके'नावाचे एक लाकडी स्टूल घेतात. तेवढाच विसावा!

काम करणाऱ्या पाचदहा माणसांचा हा जथा आपसात गंमतगप्पा करीत काम करू पाहतो. डुईवर गोणपाटाची खोळ, त्यावर बांबूकाडी आणि सागवान पानांनी बांधलेलं इरलं असतं. इरलं नसलं तर घोंगडीची खोळ असते व ती दोरीने डुईला पक्की बांधलेली असते. एवढ्या बंदोबस्तातही आखाडी पाऊस प्रत्येकाला भिजवून काढतोच. पाचदहा वर्षापूर्वीपर्यंत लावणीला भूमिहीन हरिजन, कातकाऱ्यांच्या टोळ्या मिळू शकते. त्या टोळ्यांना बहारदार रंगीन लावण्या म्हणता येत. भातलावणीच्या वेळेचे लचकदार गाणे म्हणजे 'लावणी' अशीही व्युत्पत्ती या शब्दाची असावी. लावणी, गावरान, विनाद, गावकीच्या गप्पा आणि प्रपंचातील उणीदुणी करता करता एका बांधापासून दुसऱ्या बांधापर्यंत लावणीची पाथ पोचलेली असे.

पावसात गारठलेल्या कामकऱ्यांनी संध्याकाळी चुलीपुढे शेकत उद्याची आखणी करायची आणि कुठल्या साली कशी लावणी हिकमतीने केली त्याच्या आठवणी काढायच्या, असा घरोघरी कार्यक्रम असतो. यानंतर ३–३ ।। महिन्यानंतर अशीच भातकाढणीची जुपी करायची आहे याची जाणीव सगळ्यांना तेव्हाच असते.

भाताची कहाणी ही अशी ओली कहाणी आहे. लावणीपासून काढणीपर्यंत शेतात हवं पाणी. तांदूळ शिजवायचा तरी हवं पाणी. भात खायचा तरी हवं कालवणांच पाणी आणि लावणी करणाऱ्याच्या मनगटातही हवं पाणीच.

कधीमधी पुरानं, कधी दुष्काळानं, कधी किडीनं तर कधी बाजारपडीनं भाताचा शेतकरी भुईसपाट होतो. त्या प्रत्येक वेळी त्याच्या डोळ्यात असतं पाणीच ! ▯

**प्रा. राम डिंबळे**
१९०/७ सदाशिव पेठ,
शास्त्री मार्ग, पुणे ३०

आला पाऊस तारांवरी
थेंबांच्या रांगा
कुठल्या शाळेतली
चिमुकली मुले इथे सांगा !

झेलित पाऊस आनंदाने
थरथरती पाने
वाऱ्यावरती डोलडोलती
चिंबचिंब राने

नाचत पाऊस
गवत डोलते हे हिरवेगार




माथ्यावरती तुरे फुलांचे
थेंबांचे हार

डोंगर झाले निळे
पांघरून मेघांचे शेले
घरे न्हाउनी हसू लागली
मलीनपण गेले


नजर आइची चुकवून
या रे नाचू पाण्यात
पाउसदादा चला आळवू
गुंफुनि गाण्यात !

**सरिता पदकी**
दशभुजा गणपतीजवळ,
कर्वेरोड, पुणे ४

पाऊस म्हणजे डोलत्या पिकाचं आनंदी मुख, नाही पडला तर मात्र, होई शेतकरी विन्मुख.

# 'गाव मनातलं'

**– स्नेहल चिपळूणकर**



'निर्झर झऱ्याचं शेतमळ्याचं
स्मृतीत जपलं, गाव मनातलं'

'ऋणानुबंध' हा एक जिव्हाळ्याचा शब्द. काही माणसांशी जसा आपला ऋणानुबंध जुळतो. तसं एखादं गाव, मग ते आपली जन्मभूमी असो अगर नसो; त्या गावाशी आपलं नातं जुळतं. खूप वर्ष जरी आपण त्या गावाला गेलो नाही तरी स्मृतीच्या एका कप्प्यात त्याची जागा असते. नुसत्या आठवणींनीच आपण बहरून जातो. वर्तमानकाळ विसरावयास लावणाऱ्या त्या आठवणीत गुंगून राहायला मला फार आवडतं.

रम्य बालपणाचे दिवस होते ते. वडिलांच्या फिरतीच्या नोकरीमुळे अनेक गावे पाहण्याचा योग आला. पण सर्व गावात दापोली तालुक्यातील 'पंचनदी' हे गाव मला खूपच आवडलं. जरासं उंचावर वसलेलं, जवळच एस्. टी. चा रस्ता, रस्त्यालगत हिरवेगार शेतमळे, शेतांच्या टोकाला गावाबाहेर वसलेलं शंकराचं पुरातन मंदिर. झुळझुळ वाहणारं पाटाचं निखळ शुद्ध पाणी. गाव जरासं उंचावर असल्यामुळे चढून जाण्याचा रस्ता म्हणजे, लालचुटूक दगडांनी बनवलेली 'पाखाडी' एसा क्षणात सगळं चित्र डोळ्यांसमोर उभे राहते.

आम्ही सगळे मित्र-मैत्रिणी मिळून मळ्यात जायचो. ताजी कोथिंबीर खुडून खायचो. कोथिंबिरीचा तो गंध अजूनही रेंगाळतो आहे. पाटाचं मधुर पाणी आमची तहान भागवायचं. 'प्रदूषण' या शब्दापासून खूपच लांब हे गाव होतं.

गावात एकोपा. शंकराच्या देवळात उत्सव असला की सर्वजण घरचंच कार्य समजून कामाला लागायचे. बायका वेगवेगळ्या प्रकारचे पोहे करायच्या. गावातल्या गावात नोकरीसाठी आलेल्या सर्वच माणसांना अतिशय आपुलकीची वागणूक मिळायची. संस्कार-संस्कार म्हणजे काही वेगळं आहे का ? बालपणापासून सभोवतीचं वातावरण जर निखळ असेल तर माणूस सहजच निकोप वाढू शकेल. या गावच्या वातावरणाने आपुलकी, प्रेमभाव याचे धडे दिले. लहान असल्यामुळे तेव्हा याचे महत्त्व कळत नव्हते. पण आता विचार करताना जाणवतं की या गावामुळे, तिथल्या वातावरणामुळे नक्कीच बालमनावर सुसंस्कार झाले असणार.

हल्ली शहारात राहणाऱ्या मुलांना स्वच्छंदीपणा अनुभवावयास मिळत नाही. त्यांचं जीवन धकाधकीचं झालं आहे. असं वाटतं की सगळ्या लहान मुलांचं बालपण अशा सुंदर अशा सुंदर खेड्यांध्ये जावं. ती स्वच्छंदीपणे बागडतील, निसर्गाशी जवळीक साधतील आणि निकोप वाढतील.

निसर्गावरून आठवलं, गावाभोवती खूप झाडी होती. आम्ही ज्या घरात राहायचो त्या घराच्या मागून पाटाचं पाणी झुळझुळ वाहायचं. रात्री पाटाचं पाणी प्यायला एक वाघ रोज येतो, असं घरगडी सांगायचा. एक दिवस मी जागी राहून वाघाची वाट पाहात घरगड्याबरोबर थांबले. त्यांनी सांगितलेल्या वेळी 'धप्प' असा आवाज आला. वाघाने अंगणात उडी मारली आणि तो खरोखरच पाटाचं पाणी पिऊन आल्या वाटेने निघून गेला. तोही या गावात निर्भय, स्वच्छंदी जीवन जगत होता.

पाखाडी संपली की, एक बकुळीचं मोठं झाड होतं, या झाडाला सुरेख पार बांधला होता. बकुळीच्या फुलांचा सडा पडायचा आणि सुगंध वातावरणात भरून राहायचा ! कोणत्याही महागड्या सेंटपेक्षा चिरकाल टिकणारा सुवास ! गावातल्या प्रत्येक घरासमोर फळाफुलांची झाडं होती. त्यामुळे पशूपक्षीही येथे मुक्त संचार करीत होते.

असं हे सुंदर गाव ! खूप वर्ष झाली, या गावाला परत जाण्याचा योग आलाच नाही. या दिवाळीत जाण्याचा विचार आहे. तुम्हीही माझ्याबरोबर येणार का?

□

**सौ. स्नेहल चिपळूणकर**
नेहररूनगर परल, पोहा मिलजवळ,
मु.पो. ता. रोहा, जि. रायगड

**मन असं भरून येतं, डोळ्यांतून झरून येतं, डोळ्यांत जेव्हा आसवे असतात, तेंव्हा माणसं माणसं असतात.**

## अभ्यासातील स्वालंबन

# आकलन

**भाग – १**

**प्रा. विवेक पोंक्षे**

अभ्यासातील अतिशय महत्त्वाची पायरी म्हणजे आकलन. ज्याचा अभ्यास करायचा आहे; जो विषय अवगत करायचा आहे, जी विद्या हस्तगत करायची आहे त्या सगळ्यांमधले मर्म समजणे म्हणजे आकलन.

बऱ्याचवेळा न समजताच अभ्यास केला जातो. म्हणजे वाचले जाते. सराव केला जातो. लिहिले जाते. परीक्षेत उत्तम गुणही मिळून जातात. परंतु असे असले तरी समजलेले असतेच असे नाही. समजून न घेता निव्वळ घोकंपट्टी करून अनेकदा एखादा विषय परीक्षेसाठी तयार केला जातो. पण त्याचा काय उपयोग ? किंबहुना एखादा मुद्दा सर्वार्थाने कळला असेल तर तो लक्षात ठेवण्यासाठी फारसे प्रयत्नही करावे लागत नाहीत. आडात नसेल ते पोहोऱ्यात तरी कोठून येणार ? या न्यायाने समजेलच नसेल तर त्याचा उपयोग तरी कसा करणार ?

आपल्याला एखादी गोष्ट कळली आहे की नाही हे कळणे अतिशय महत्त्वाचे असते. शालेय अभ्यासात मागे पडणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांच्या बाबतीत लक्षात येते की, आपल्याला एखादी गोष्ट कळली नाही हेच कळलेले नसते. त्यांना प्रामाणिकपणे असे वाटत असते की, वर्गात शिकवेला एखादा धडा आपल्याला शंभर टक्के समजलेला आहे. या मुलामुलींच्या तोंडात असे एखादे वाक्य असते.




''सर वर्गात शिकवतात तेव्हा सगळे कळते, पण घरी गेल्यावर काय होते कोण जाणे ?

पुन्हा तोच भाग वाचायला घेतला की, काहीच लक्षात येत नाही.'' म्हणजे यात मूळ गृहितातच काहीतरी चूक होते आहे. वर्गात शिकवलेले खरे तर सगळे समजलेले नाही. त्यातही महत्त्वाचे मुद्दे तरी नक्कीच समजलेले नाहीत. त्यामुळे सगळाच धडा परत वाचताना समजत नाही असे वाटते.

तुम्हा अनेकांच्या बाबतीत आणखी एक प्रकार नक्की कधी ना कधी घडला असेल. एखादा मुलगा नाहीतर मुलगी आमच्याकडे येऊन म्हणते ''सर, ते आज शिकवलेल्या प्रकरणातले एक गणित कळले नाही.'' मग आम्ही विचारतो, ''त्या गणितातलं काय कळलं नाही ?'' त्यावर बहुदा उत्तर येतं. ''काहीच कळलं नाही!'' खरे तर काहीच कळले नाही, असे कधी घडत नसते. काही थोडेतरी नक्कीच कळलेले असते. पण कळलेला भाग आणि न कळलेला भाग यातील सीमारेषा खूपच धूसर असते म्हणून असे घडते किंवा काही वेळेला आपल्याला एखादा भाग समजला आहे आणि एखादा भाग समजला नाही म्हणजे काय ते नेमक्या शब्दांत मांडता येत नाही. अशा वेळेला आम्हा शिक्षकांनाच तुम्हाला प्रश्न विचारून तुमच्या आकलनातल्या त्रुटी शोधून काढाव्या लागतात. अशा त्रुटी राहू नयेत म्हणून स्वतःचा स्वतः अभ्यास करताना सराव, उजळणी, परीक्षेत उत्तरे लिहिण्यासाठी लागणारी तंत्रे या सगळ्याइतकेच किंबहुना थोडे जास्तच महत्त्व आणि वेळ आपले आकलन पक्के करण्यासाठी दिला पाहिजे.

### आकलनाचा अर्थ

अभ्यासातला एखादा भागातला आशय आपल्याला समजतो म्हणजे बरेच काही घडत असते. आपण जे वाचतो, ऐकतो किंवा अनुभवतो त्याचा वरवरचा अर्थ आपल्याला समजतो. म्हणजे त्या सगळ्याचा सर्वसाधारणपणे प्रचलित जो अर्थच असेल तो आपल्याला समजतो. म्हणजे वाच्यार्थ समजतो. उदा.'इकडे आड तिकडे विहीर' या वाक्यात इकडे व तिकडे या दोन शब्दांनी दोन विरूद्ध बाजू सांगायच्या आहेत हे कळले. आड म्हणजे विहीर हेही आपल्याला पूर्वानुभावारून माहीत असू शकते. काहीवेळा आड म्हणजे विहीर हेच माहीत नसेल तर हे वाक्य म्हणणाऱ्याच्या दोन्ही बाजूला

विहिरी आहेत हा सरळ अर्थही समजला नाही असे होईल. पण या वाक्यात आणखीही अर्थ दडलेला आहे. हे वाक्य म्हणताना त्या व्यक्तिला कोणताही मार्ग स्वीकारला तरी समोर संकट आहे असे सुचवायचे आहे. हा अर्थ समजला तर मग शब्दांच्या पलिकडे समजले. वाच्यार्थ आणि गर्भितार्थ दोन्ही समजणे म्हणजे आकलन होणे.

x+y = 0 हे समीकरण पाहिले म्हणजे सरळ काय समजते ? तर हे दोन चलांतील एक समीकरण आहे. पण या समीकरणात दडलेले जास्तीत जास्त अर्थ लक्षात आले तर x+y = 0 हे समीकरण समजले असे होईल उदा.

१. हे समीकरण एका रेषेचे समीकरण आहे.
२. या समीकरणाला अनंत उकली आहेत.
३. या उकलींमधील x व y च्या किंमती नेहमी विरूद्ध संख्या असणार.
४. ही रेषा दुसऱ्या आणि चवथ्या चरणात आहे.
५. या रेषेने x अक्षाशी १३५° चा कोन केला आहे.
६. ही रेषा x व y अक्षांमधील कोनाला दुभागते. इ.

थोडक्यात जर 'त' वरून ताकभात ओळखता येत असेल तर आशयाचे पुरसे आकलन झाले आहे असे समजायला हरकत नाही.

एखादा परिच्छेद वाचताना लेखकाला जे जे म्हणायचे आहे त्याच्या सर्व छटा आपल्या लक्षात आल्या, तर त्याला म्हणायचे, 'वाचलेले समजले' (Reading comprehension). हेच एखाद्याचे बोलणे ऐकताना झाले की म्हणायचे, 'ऐकलेले समजले' (Listening comprehension). नेहमी पाहून, वाचून अथवा ऐकूनच समजते असे नाही. काही बाबतीत प्रत्यक्ष करून पहावे लागते. करता करता ते आपल्याला समजले असेही होते. पोहोण्यावर कितीही व्याख्याने ऐकली, कितीही फिल्मस् पाहिल्या तरी पोहोण्याचे तंत्र समजून घेण्यासाठी पाण्यात उतरावेच लागते.

## आकलन वाढण्यासाठी प्राथमिक कृती

शाळेत एखादा धडा शिकवाला जाण्यापूर्वी तुम्ही जर तो वाचलात तर तो धडा तुम्हाला अजिबात समजला नाही असे होत नाही. तो थोडाफार समजतो.तसेच त्यात न समजलेलाही काही भाग असतो . काय समजले व काय समजले नाही हे धडा शिकवला जायच्या आधीच तुम्हाला निश्चित करता आले तर वर्गात धडा चांगला समजू शकतो. यालाच पूर्ववाचन म्हणतात. पूर्ववाचन करताना मनात मुद्दाम अनेक प्रश्न निर्माण झाले पाहिजेत. हे प्रश्न एका अर्थी चांगल्या शंका असतात. धडा वाचताना आलेल्या शंका वहीत टिपून ठेवा. नंतर वर्गात तो धडा शिकवला जात असताना तुमच्या शंकांची उत्तरे मिळताहेत का यावर लक्ष ठेवा. जर सर्व शंकांची उत्तरे मिळाली तर आकलन उत्तम झाले असे म्हणायचे.

धडा शिकवून झाल्यानंतर धडा आपल्याला समजला का ? हे पाहण्यासाठी धड्याखाली प्रश्न दिलेले असतात. त्यांची उत्तरे तुम्ही गृहपाठ म्हणून लिहिता. आकलन वाढविण्यासाठी आणखी एक प्रकार करून पाहाता येईल. तुम्ही शिकवलेल्या धड्यावर जास्तीत जास्त प्रश्न तुम्हीच तयार करायचे. एका वाक्यात उत्तरे द्या. या प्रकारचे प्रश्न तयार करणे सुरूवातीला शक्य असते. त्यामध्ये माहितीपर प्रश्न विचारता येतील. पण त्याच्या इतकेच महत्त्वाचे प्रश्न विविध प्रकारच्या संबंधांवर तयार करावेत. विशेषतः अनेक छोटे-छोटे प्रश्न तुम्ही तयार करा. हे प्रश्न तयार करताना वेगळ्या दृष्टीने विचार होतो. त्यामुळे धड्यातील न कळलेल्या गोष्टी कळतील, महत्त्वाचे व कमी महत्त्वाचे भाग समजतील. या महिन्यात तुम्ही शिकलेल्या प्रत्येक विषयातील एकेका धड्यावर कमीत कमी वीस प्रश्न स्वतः तयार करून पाहा. नंतर त्यांची उत्तरे पुस्तकांत शोधा. म्हणजे आपोआपच धडा सर्व बाजूंनी पुन्हा पुन्हा वाचला जाईल.

आकलनासंबधी अधिक तपशील पुढील लेखात पाहूयात.

**विवेक पोंक्षे**
प्राचार्य, ज्ञा.प्र.प्र., पुणे

# सुदाम्याचे पोहे

*(दिवाळी अंक पुस्तक परिचय स्पर्धेतील तृतीय क्रमांकाचे परीक्षण)*

**चि. अद्वैत इंगोले**

आपल्या दैनंदिन व्यवहारातून त्रासलेली माणसं कुठेतरी विरंगुळा शोधण्याच्या प्रयत्नात असतात. जीवनात सुसंगत स्थितीत त्यांना खुलवणारा, फुलवणारा असा दुवा सापडत नाही, पण विनोदी लेखनातून त्यांना खळखळून हसविणारा एखादा लेखक असतो. तो जगण्याचं तत्त्वज्ञान वाचकाला देत नाही तर हसण्याचे प्रसंग आपल्या लेखनातून निर्माण करतो. असाच एक निखळ विनोद निर्माण करणारा लेखक, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. त्यांच्या 'सुदाम्याचे पोहे' हा विनोदी ग्रंथ प्रसिद्ध

'सुदाम्याचे पोहे' या बत्तीस लेखातूंन वाचकाला चौसष्ट कलांची अनुभूती यायला लागते. बत्तीसही लेख निखळ विनोदी आहेत. त्यांच्यातील विविध व्यक्तिरेखा आपल्या सभोवताल वावरताना दिसतात. ती माणसं व त्यांनी निर्माण केलेल्या प्रसंगातील विनोद यात नावीन्य असं काही नसेलही, पण जुनेच नव्या पद्धतीने मांडून विसंगतीतून विनोद निर्माण केले आहेत. त्यांच्या विनोदात व्यंगोक्ती वक्रोक्ती व अतिशयोक्ती असेलही; पण या सगळ्या संमिश्राणातून विनोदनिर्मिती होऊन वाचकांच्या मनात हास्याचे धबधबे उठतात.

कोल्हटकरांच्या विनोद निर्मिती पद्धतीचे पुरस्कर्ते आहेत मार्क ट्वेन, मॅक्स ऑरेल, चेस्टर्टन. जाणीवपूर्वक विनोद निर्माण करून जगणं सुसह्य करणारी कोल्हटकरांची पद्धती अप्रतिम आहे. विनोदी लेखन करण्यास लागणारी अफाट प्रतिभाशक्ती कोल्हटकरांच्या लेखनातून दिसून येते. विनोदी लेखक हा समाजातील सुसंगतीचे, सद्प्रवृत्तीचे निरीक्षण न करता हास्योत्पादनासाठी नेमक्या विकृतीचाच शोध घेत असतो. विनोदी छटा आपल्या लेखनातून उमटल्याशिवाय त्याला लेखन समाधान लाभत नाही.

कोल्हटकरांची लेखमाला ज्या काळात आकाराला आली तो काळ, या लेखातील मर्माला स्पर्श करणारा होता. सामाजिक परिवर्तन व संक्रमणाचा काळ होता. त्यांच्या प्रत्येक लेखातील व्यक्तिरेखा ह्या त्या काळाच्या प्रतिनिधी आहेत.



'साक्षीदार' या लेखात न्यायसभेत निर्ढावलेल्या लोकांना 'साक्षीदार' हा किती विलक्षण प्राणी आहे, हे सांगावयास नको. 'साक्षीदार' या प्राण्याचे मातापितर 'पुराव्याचे गरज' व 'पोटगी भत्ता' हे होत.साक्षीदाराचा व्यवसाय तंटे-सोडविणे असतो. त्यामुळे जेथे जेथे म्हणून देवघेव वगैरे चालली असेल, तेथे तेथे असा साक्षीदार ठेवलेला असायचा. आता असा फुरसदी साक्षीदार दुर्मिळ झाला आहे. पण साक्षीदार विनोद मात्र अविस्मरणीय आहे.

'कुलूप' याकील भाषिक सहजता विलक्षण आहे. 'कुलुपासारखा रखवालदार त्रिभुवनात सापडणार नाही. त्याच्यापुढे पैशाची तिजोरी ओतली तरी त्याने दारास मारलेली मगरमिठी सुटायची नाही किंवा स्त्रियांच्या नेत्रकटाक्षांनी त्याचं लोखंडी हृदय विरघळावयाचे नाही. पहारा करताना डुलकी त्याला कधीच लागत नाही.' यासारख्या वाक्यांतून ती जाणवते.

'चोरांचे संमेलन'तर पुढाऱ्यांनाही अन्तर्मुख करायला लावणारे आहे. या लेखातील ठरावाने तर विनोदाचा कळसच गाठला आहे. त्यातील ठराव ''दारू पिऊन चोरी केल्यास पुष्कळदा यश येत नाही. सबब ही सभा मद्यपानाचा जोराने निषेध करीत आहे.'' हा विनोद अतिशय बोलका आहे. 'याचक' या लेखात 'काशीहून मुद्दाम मजकडे भिक्षुक यावा व तोही माझे नाव ऐकून.' हे

चेतोवृत्तीही नाचतात म्हणती का आमच्या पारखी, आहे वाङ्मय आपले नवरसी ओथंबले हे किती.

पाहून मला फार धन्यता वाटली व मी मनातल्या मनात आपल्या पाठीवर बऱ्याच शाबासक्या घेतल्या.

म्हातारपणाचे फायदे सांगताना पहिला मोठा फायदा म्हणजे त्यांची दात घासण्याची दगदग नाहीशी होते. त्यांना बत्तिशी रंगविण्याची धमकी मिळत नाही. 'चित्रगुप्ताचा जमाखर्च' यात 'पण ही महापातके, चित्रगुप्ताच्या चुकीमुळे नानाच्या खात्यावर खर्ची पडली नव्हती.' यातून जमाखर्चाची टवाळकी कोल्हटकरांनी उडविली. चित्रगुप्ताची देखील जमाखर्चात चूक होऊ शकते हे दाखविले आहे.

'सुदाम्याचे पोहे' या संग्रहातील प्रत्येक लेख हा निखळ विनोद निर्माण करणारा आहे. कोल्हटकरांचे विनोद अश्लील नाहीत, फक्त विसंगती दाखवणारे आहेत.त्यात हास्यरस अगदी तुडूंब भरला आहे. हास्यरस निर्माण करताना देखील त्यांनी भाषिक भान सोडलेले नाही. 'धर्मान्तर' या लेखातही त्यांनी धर्माची विटंबना न करता धर्माच्या बारकाव्यांवर बोट ठेवून विनोद निर्माण केले आहेत.

त्यांच्या विनोदाने भाषिक दर्जा सोडला नाही व द्व्यर्थी विनोद निर्मितीच्या आहारी ते गेले नाहीत. विनोदीलेखन करताना त्यांच्या तरल, तिरकस, कुशाग्र बुद्धिमत्तेची व विलक्षण निरीक्षण चातुर्याची अनुभूती येते. विनोद हा जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. तो सर्वांना माफक स्वरूपात हवा असतो. कोल्हटकरांनी केलेले विनोदी लेखन हे नितांत निर्मळ सुंदर, देखणे असे आहे. विनोदी लेखन करण्याची श्रीमंत कला त्यांना अवगत झाली. त्यातून 'सुदाम्याचे पोहे' हा विनोदी ग्रंथ उदयास आला. 'वाचक' नावाच्या श्रीकृष्णाने तो मोठ्या प्रेमाने स्विकारला आहे.

**चि. अद्वैत इंगोले**
९ वी, जे.डी. चवरे विद्यामंदीर,
कारंजा (लाड) जि. अकोला.

## ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये योजावयाचा कार्यक्रम

**गणेशोत्सव मंडळातील कार्यकर्त्यांशी गप्पा** : गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील एक मोठा सार्वजनिक उत्सव! हजारो तरुण मंडळे अन् लाखो कार्यकर्ते या काळात गणेशोत्सव यशस्वीपणे पार पडावा यासाठी रात्रंदिवस धडपडत असतात. त्यांची धडपड समजून घेण्याचा प्रयत्न यावर्षीच्या गणेशोत्सवात करूयात. आपल्या परिसरातील ५-१० गणेशोत्सव मंडळांची नावे निश्चित करून त्यातील दोन-दोन मंडळे आपल्याकडील मुलांच्या एकेका गटाला द्या. त्या गटाने त्या गणेशोत्सव मंडळातील कार्यकर्त्यांना एकत्र किंवा स्वतंत्रपणे भेटून त्यांना विविध प्रश्न विचारावेत व माहिती गोळा करावी. मंडळ केव्हा सुरू झाले ? आत्तापर्यंत कोणकोणते देखावे, सजावट केली ? कोणकोणते कार्यक्रम राबवतात ? आत्तापर्यंतच्या काळातले विशेष लक्षात राहिलेले वर्ष, प्रसंग कोणते ? गणेशोत्सवाचे नियोजन कसे करतात ? पहिली बैठक केव्हा होते ? देखावा-कार्यक्रम कसे ठरतात ? पैसे कसे उभे करतात ? पुढील योजना काय आहेत ? नवीन कार्यकर्ते उभे राहतात का? सध्याच्या तुमच्या मंडळाच्या कार्यक्रमांमध्ये काय उणिवा आहेत ? इतरांपेक्षा काय वैशिष्ट्ये आहेत ? मूळ हेतूला धरून गणेशोत्सव होतो का ?रहिवाशांचा प्रतिसाद कसा असतो ? इ. सारखे अजून १५-२० प्रश्न काढावेत. विविध प्रकारच्या कार्यकर्त्यांना भेटून ते प्रश्न विचारावेत. गणेशोत्सव काळात दिवसातला १-२ तास तेथे थांबावे. त्यातून अनेक प्रकारच्या व्यक्तींचा जवळून परिचय होईल. त्यांच्या कामांची शैली समजेल. समूहशक्तीने कामे कशी होतात ? हे पाहून-विचारून कळू लागेल. एकमेकांचे अनुभव एकमेकांना सांगा. सर्वांची वृत्ते एकत्र करून त्याचे हस्तलिखित तयार करा. विविध प्रकाशचित्रांनी ते सजवा. हे सर्व केले की आम्हाला कळवा.

कठांत गुंफलेली शुभ शब्द पुष्पमाला, जी चेतवी मनास अक्षय्य चिन्तनाला.

# दीपावली विशेषांक-९८

## वितरण व्यवस्था

नेहमीप्रमाणे यावर्षीही छात्र प्रबोधनचा दीपावली विशेषांक स्थानिक वितरण केंद्रांवर उपलब्ध होईल. वितरण केंद्रांचे पत्ते पुढील अंकात दिले जातील. सभासदांनी न विसरता, न कंटाळता आपला दिवाळी अंक तेथून घेऊन जावा. वितरण केंद्रे नसलेल्या ठिकाणी साध्या पोस्टाने अंक पाठविले जातील. त्यांना अंक न मिळाल्यास दुसरा अंक पाठविला जाणार नाही. ज्यांना दिवाळी अंक घरपोच व खात्रीशीर हवा असेल अशांनी, स्थानिक अथवा मुख्य कार्यालयात वर्गणी व्यतिरिक्त रु. २५/- जादा भरावेत. त्यांना अंक रजिस्टर्ड पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविले जाईल.

### वितरण केंद्रे असणारी गावे

बोरीवली, विले पार्ले, बांद्रा, मुलुंड, ठाणे, डोंबिवली, कल्याण, बदलापूर, रसायनी, पेण, कर्जत, रोहा, नागोठणे, अलिबाग, किहीम, महाड, चिपळूण, दापोली, देवरुख, रत्नागिरी, कणकवली, सावंतवाडी, पणजी, मडगाव, बेळगाव, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, इस्लामपूर, विटा, कराड, सातारा, वाई, फलटण, बारामती, पुणे, अहमदनगर, श्रीरामपूर, कोपरगाव, नाशिक, नाशिक रोड, निफाड, धुळे, नंदूरबार, शहादा, जळगाव, चोपडा, चाळीसगाव, जालना, औरंगाबाद, लातूर, परभणी, सेलू, माजलगाव, परळी वैजनाथ, धाराशिव, नांदेड, अकोला, मंगरुळपीर, हिवरा मुरादे, नागपूर, अमरावती, बार्शी, पंढरपूर, सोलापूर.

### खालील ठिकाणी वितरण केंद्रे सुरू करावयाची आहेत.

**दादर, अंधेरी, गोरेगाव, कांदिवली, नवी मुंबई, पनवेल, वसई, संगमनेर, साक्री, मालेगाव, भुसावळ.**

संबंधित गावातील इच्छुक व्यक्तींनी (ज्यांची स्वयंसेवीवृत्तीने, जबाबदारीपूर्वक हे काम करण्याची तयारी आहे असे) १५ ऑगस्टपूर्वी संपर्क साधावा. पत्रव्यवहार करताना नाव, पत्ता, दूरभाष क्रमांक इ. तपशील लिहावेत.

**याव्यतिरिक्त अन्य ठिकाणी वितरण केंद्र सुरू करण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यांनी त्यासंबंधी छात्र प्रबोधनच्या मुख्य केंद्राशी तातडीने पत्रव्यवहार करावा.** त्यांनी आपल्या गावामध्ये किमान २० सभासद मिळविले, तरच तेथे वितरण केंद्र सुरू करता येईल. त्यासाठी आवश्यक ते प्रचार साहित्य छात्र प्रबोधनच्या कार्यालयाकडून मिळू शकेल.

***सर्व सभासदांनी ही वितरण व्यवस्था सुरळीत होण्यासाठी सहकार्य करावे.***

## अनुभवांची साखळी अन् निखळ आनंदाचा खजिना!

### तंबूतील शिबिर अन् गिरीभ्रमण

**कालावधी :** २३ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर १९९८ **स्थळ :** पुणे जिल्ह्यातील निसर्गरम्य परिसरात

**शुल्क :** रु. ५००/- (शिबिर काळातील निवास, प्रवास, भोजन इ. सह)

(शुल्क भरण्यात आर्थिक अडचण असलेल्या सभासदांनी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.)

**वयोगट :** इ. ८ वी ते प्रथमवर्ष पदवी पर्यंतच्या सभासद असलेल्या मुलामुलींसाठी (मुलांचे व मुलींचे शिबिर स्वतंत्र होईल.)

शिबिराबाबतचे अन्य तपशील १५ सप्टेंबरनंतर स्थानिक कार्यालयांमध्ये उपलब्ध होतील.

शारीरिक क्षमता ताणणाऱ्या अन् सहजीवनाचा आनंद मिळवून देणाऱ्या, स्वावलंबनाची जाणीव वाढविणाऱ्या अन् ग्रामीण जीवनाचा जवळून परिचय घडविणाऱ्या, निसर्ग सान्निध्यात रमविणाऱ्या अन् संकटे-अडचणींचा अनुभव देणाऱ्या या शिबिरात आवर्जून सहभागी व्हा!

**दीपावलीची सुट्टी अधिक आनंदी अन् अनुभवसमृद्ध करण्याची संधी दवडू नका!**

नोंदणी क्रमांक : PHM/22/VIII/1997 टपाल नोंदणी क्र. PNCW/349 छात्र प्रबोधन; तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. L128

# स्वातंत्र्याचा सूर्य

**चला वाजवा यशोदुंदुभी प्राणातुन चौघडे**
**स्वातंत्र्याचा सूर्य निघाला**
**नवीन शतकाकडे**

**अंधाराची उसवुन बाही**
**प्रकाश झाला दिशात दाही**
**अभेद सामर्थ्याने घाला गगनाला साकडे**

**खुशाल हाका, रथ घोड्याचा**
**इतिहासाची पाने वाचा**
**तुम्हीच तुमच्या आयुष्याचे पाईक व्हा यापुढे**

**महान आशा, आकांक्षावर**
**आज, उद्याचे कोरा अक्षर**
**उभारल्या राष्ट्राचे गिरवा मस्त मोकळे धडे**

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ
पुणे 411 030 ☎(०२१२) ४७७६९१, ४७८०९५
**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत** : रुपये १०/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १२५/-
**प्रकाशन दिनांक** : राष्ट्रीय सौर १० श्रावण, शके १९२०
१ ऑगस्ट १९९८